



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १८७ * नांदेड * बुधवार, दि. १५ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## मंत्रिमंडळ विस्तारात खांदेपालट होण्याची शक्यता

### अमित शाह-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात दिल्लीत एक तास चर्चा

**मुंबई (प्रतिनिधी)–** विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर आता मंत्रिमंडळ विस्ताराच्या हालचालींना वेग आला असून केंद्रातही लवकरच मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याची चर्चा आहे. अधिवेशनापूर्वीच राज्यात ऑपरेशन टायगरच्या माध्यमातून एकनाथ शिंदेंनी ठाकरेंना धक्का दिला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेतील ६ खासदारांनी एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेतला आहे. त्याच पार्श्वभूमीवर आता शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीला गेले होते. यावेळी गृहमंत्री अमित शाह व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा झाल्याचे बोलले जात आहे.

शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे आगामी मंत्रिमंडळ विस्तारावरुन ॲक्शन मोडवर आहेत. नंदनवन बंगल्यावर शिवसेनेतील वरिष्ठ नेते आणि कॅबिनेट मंत्र्यांसोबत त्यांची बैठक होत आहे. बैठकीत केंद्रीय मंत्रीमंडळ विस्तार आणि राज्यातील रखडलेल्या महामंडळ विस्तारावर चर्चा होणार असून राज्यातही कॅबिनेटमध्ये खांदेपालट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. राज्यातील मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांच्या कामावरही नाराजी असल्याने



त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात येणार असल्याचे समजते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकदिवसीय दिल्ली दौरा करून एकनाथ शिंदे मुंबईत पुन्हा परतले आहेत. ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्यानंतर शिंदे पहिल्यांदाच दिल्लीला गेले होते.राज्यातील इतरही काही महत्त्वाच्या विषयावर याठिकाणी चर्चा झाल्याचे बोलले जात आहे.

बैठकीपूर्वी एकनाथ शिंदेंनी माध्यमांशी संवाद साधताना उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं. दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू असलेल्या सोनम वांगचूक यांच्या आंदोलनास पाठिंबा दिल्यावरुन एकनाथ शिंदेंनी ठाकरेंना टोला लगावला. खरं म्हणजे आता इतक्या उशिरा सुचलेलं शहाणपण म्हणावे लागेल, त्यांचा सगळ्यावेळेस बाहेरुन पाठिंबा असतो. तुम्ही लढा आम्ही बाहेरुन कपडे सांभाळतो, बुडाला आग लागलीय आणि डोंगराची आग विझवायला जात आहेत, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. सोनम वानचूक यांचे काय आता? जेव्हा जेव्हा सरकारविरोधात आंदोलनं असतात तेव्हा यांचा त्यांना पाठिंबा असतो. श्रीलंका, बांगलादेश, नेपाळमध्ये झालं त्याची आठवण करुन देण्याचं काम ते करत आहेत. पोळी कशी भाजून घेता येईल यासाठी राजकारण करण्याचा प्रयत्न आहे, असे म्हणत सोनम वांगचूक यांच्या आंदोलनास पाठिंबा दिल्यावरुन एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर टीका केली.

कायदा सुव्यवस्था कशी बिघडेल, अराजकता कशी माजेल यासाठी हे प्रयत्न करत आहेत. बांग्लादेश, नेपाळ, श्रीलंका इथली आर्थिक परिस्थिती रसतळाला गेली होती, पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील आपल्या देश पुढे जात आहे. ८० हजार लोकांना अन्न धान्य देण्याचे काम होतंय, ३२ कोटी लोकांना दारिद्र्य रेषेतून वर आणण्याचा प्रयत्न होतोय, अशी माहिती एकनाथ शिंदेंनी दिली.

## कै. शंकररावजी चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त वडगाव येथे समाधीस्थळी अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री आणि माजी मुख्यमंत्री कै. डॉ. शंकररावजी चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त नांदेड तालुक्यातील वडगाव येथील समाधीस्थळी अभिवादन करण्यात आले.

सकाळी १० वाजता खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते समाधीचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी आमदार अमिता चव्हाण, आमदार ॲड. श्रीजया चव्हाण, सुजया चव्हाण, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, मीनलताई खतगावकर यांच्यासह चव्हाण कुटुंबीय उपस्थित होते.



त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड यांनी समाधीस्थळी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

समाधीस्थळी पुष्पांनी सजावट करण्यात आली होती. याप्रसंगी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर सौ. कविता मुळे, माजी महापौर मंगला निमकर, माजी आमदार डी. पी. सावंत, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, माजी चेअरमन गणपतराव तिडके, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मंगलाताई अंबुलगेकर, बी. आर. कदम, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन संजय लहानकर उपस्थित होते.

याशिवाय मनपा स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, नगरसेवक संजय पाटील घोगरे, प्रशांत तिडके, सरजितसिंघ गिल, गोविंदराव नागेलीकर, माजी नगरसेवक बालाजी जाधव, संतोष पांडागळे, प्रवीण साले, माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, कल्याणकर, भाजपा कंधार अध्यक्ष बालाजी पांडागळे, मारोती शंखतीर्थकर, सरपंच गंगाधर शिंदे, डॉ. नरेश रायेवार, शिवराम लुट्टे, डॉ. अशोक कलंत्री, जनार्दन गुपीले, दलित मित्र माधव आंबटवार, राजन जेजोरे, रमेश तालीमकर, रमेश वाघमारे, सादिक मरखेलकर यांच्यासह जिल्ह्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य, मनपा, नपा आणि ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कै. शंकररावजी चव्हाण यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी केला.

## पुण्यात एटीएसकडून ६० ठिकाणी छापे

**पुणे (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र एटीएसने अनेक मोठ्या शहरांमध्ये कारवाई सुरू केली आहे. महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने पुणे शहर, पुणे ग्रामीण आणि पिंपरी-चिंचवड परिसरात मोठी छापेमारी सुरू केली आहे. पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टी आणि त्याच्या कथित आयएसआय संपर्कांच्या अनुषंगाने ६० हून अधिक संशयित व्यक्तींवर एटीएसची नजर असून, त्यांच्या घरांवर एकाचवेळी छापे टाकण्यात आले आहेत.




**नांदेड–** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आगामी निवडणूक समन्वयातून व्हावी, यासाठी सामूहिक प्रयत्नांचा एक भाग म्हणून मंगळवारी नांदेड येथे सहकार क्षेत्रात कार्यरत विविध पक्षांतील नेत्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीला माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. प्रताप पाटील चिखलीकर, खा. रवींद्र चव्हाण, आ. भीमराव केराम, आ. राजेश पवार, आ. अमरनाथ राजूरकर, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, माजी आ. राम पाटील रातोळीकर, माधवराव जवळगावकर, हनुमंत पाटील बेटमोगरेकर, मीनलताई पाटील खतगावकर, उमरीचे उपनगराध्यक्ष कैलास गोरठेकर, गंगाधरराव राठोड आदी दिसत आहेत.

## नांदेड-संतरागाछी एक्स्प्रेससह ५ गाड्यांच्या वेळेत बदल

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रवाशांना जलद व दर्जेदार सेवा देण्यासाठी तसेच रेल्वे परिचालन अधिक कार्यक्षम बनवण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेने काही महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्यांचा वेग वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार या गाड्यांच्या वेळापत्रकात सुधारणा करण्यात आली असून, नवीन वेळापत्रक टप्प्याटप्प्याने जुलै व सप्टेंबरपासून लागू होणार आहे.

नांदेडहून २० जुलैपासून आणि संतरागाछीहून १६ सप्टेंबरपासून नवीन वेळापत्रक लागू करण्यात येणार आहे. त्यानंतर यामुळे नांदेड येथील सुटण्याची व आगमनाची वेळ, तसेच मुदखेड आणि हिमायतनगर स्थानकांवरील वेळेत बदल करण्यात येणार आहे.

पूर्णाहून १६ जुलैपासून आणि पाटणाहून १९ सप्टेंबरपासून सुधारित वेळापत्रक लागू करण्यात येणार आहे. त्यानंतर नांदेड, हिमायतनगर, सहस्त्रकुंड, किनवट आणि आदिलाबाद स्थानकांच्या वेळेत सुधारणा करण्यात आली आहे.

दि. १० ऑगस्टपासून नवीन वेळापत्रक लागू करण्यात येणार आहे. त्यानंतर परळी वैजनाथ, गंगाखेड, परभणी, मानवत रोड, सेलू, परतूर, जालना आणि छत्रपती संभाजीनगर या स्थानकांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. प्रभावित प्रवाशांना एसएमएसद्वारे माहिती देण्यात येईल.

फिरोजपूरहून १७ जुलैपासून आणि नांदेडहून १९ जुलैपासून सुधारित वेळापत्रक लागू करण्यात येणार आहे. त्यानंतर नांदेडसह पूर्णा, परभणी, सेलू, जालना आणि छत्रपती संभाजीनगर स्थानकांच्या वेळेत सुधारणा करण्यात आली आहे.

## नागरिकांचा विश्वास वाढवण्यासाठी 'जनसंवाद' उपक्रम



- उमाप यांनी परभणीत घेतला तक्रारींचा आढावा
- 'संवेदना' पोर्टलद्वारे तक्रारींचा जलद निपटारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नागरिकांच्या तक्रारींचा जलद निपटारा करून पोलीस आणि नागरिकांमधील संवाद वाढवण्यासाठी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी 'जनसंवाद' हा विशेष उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत दि. १४ जुलै रोजी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी परभणी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात जिल्हा पोलीसांच्या मासिक कामगिरीचा आढावा घेतला. त्यानंतर दुपारी ३ ते ४.३० या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला.

यावेळी एकूण २२ तक्रारदारांनी आपले लेखी अर्ज सादर केले. यामध्ये मालमत्ता विषयक वाद, बेपत्ता व्यक्ती, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांच्या तपासाबाबत, अवैध व्यवसाय आदी विविध तक्रारींचा समावेश होता.

प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींची गांभीर्याने दखल घेत त्यांच्या जलद निवारणासाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना तातडीच्या सूचना देण्यात आल्या.

तक्रारींच्या जलद निपटाऱ्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने 'संवेदना' ही ऑनलाईन तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. 'जनसंवाद' दरम्यान प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलवर नोंदवून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आले आहेत. प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेतला जाणार आहे.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी आणि परभणी शहरातील पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.





**नांदेड :** माजी केंद्रीयमंत्री डॉ. शंकररावजी चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करताना माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, आमदार अमरनाथ राजूरकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, महापौर सौ. कविता मुळे, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

## सुनेत्रा पवार यांच्या निवडीला आक्षेप घेत नोटीस

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या निवडीला आक्षेप घेत चक्क त्यांनाच नोटीस बजावण्यात आल्याने राजकीय वर्तुळात भूकंप झाल्याचं दिसून येत आहे.

एकीकडे शरद पवारांची राष्ट्रवादी सत्तेत सहभागी होणार असल्याची चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादीत काहीही आलबेल नसल्याचं पाहायला मिळत आहे. पक्षाचे राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनीची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या निवडीला आक्षेप घेत नोटीस बजावली होती. या नोटीसवर राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांकडून प्रतिक्रिया आल्या आहेत. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही प्रतिक्रिया देत, नोटीसमध्ये तथ्य नसल्याचं म्हटलं.




## जिल्हा परिषदेचा डिजीटल निर्णय; आता सर्व पत्रव्यवहार ई- ऑफिसमधून होणार -सीईओ पाटील



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील जिल्हा परिषदेने प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि पेपरलेस करण्याच्या उद्देशाने डिजीटल निर्णय घेतला आहे. यानूसार आता सर्व विभागांनी आता ई- ऑफिस प्रणालीद्वारेच फाईल व टपाल व्यवहार केले जाणार आहेत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी नुकतेच सर्व विभागांना निर्देश दिले आहेत.

या अनुषंगाने जिल्हा परिषद आस्थापनेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे शासकीय ई-मेल आयडी तयार करण्यात आले असून, यापुढे कार्यालयीन पत्रव्यवहार, टपाल तसेच फाईलची देवाण- घेवाण ई- ऑफिस प्रणालीद्वारे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ई-ऑफिस प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यापूर्वी जिल्हा व तालुकास्तरावरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या गट क संवर्गातील एकूण ८८१ कर्मचाऱ्यापैकी ७७२ जणांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच आतापर्यंत ५६ हजारांहून अधिक ई- फाईल्स तयार करण्यात आल्या असून ५२ हजार ४२१ टपालांचा ई- ऑफिसद्वारे व्यवहार करण्यात आला आहे.

ई- ऑफिस (पान ३ वर...)

## आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरसाठी विशेष रेल्वेगाड्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर येथे होणाऱ्या यात्रेसाठी होणारी अतिरिक्त प्रवासी गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने विशेष रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. नांदेड विभागातील प्रवाशांना पंढरपूरला जाण्यासाठी अतिरिक्त सुविधा उपलब्ध होणार आहे.

गाडी क्रमांक ०७६३१ नगरसुल पंढरपूर ही विशेष गाडी शुक्रवार, २४ जुलै रोजी नगरसोल येथून सायंकाळी ७ वाजता सुटेल आणि रोटेगाव, लासूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाऊन, कुर्डुवाडी मार्गे पंढरपूरपर्यंत येथे शनिवारी दुपारी १२.५० वाजता पोहोचणार आहे.

गाडी क्रमांक ०७६३२ पंढरपूर जालना ही विशेष गाडी शनिवार, २५ जुलै रोजी पंढरपूर येथून रात्री २०.०० वाजता सुटेल आणि कुर्डुवाडी, बार्शी टाऊन, धाराशिव, लातूर, लातूर रोड, परळी वैजनाथ, गंगाखेड, परभणी, मानवत रोड, सेलू, परतूर मार्गे जालना येथे रविवारी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७६३३ आदिलाबाद पंढरपूर-मिरज ही विशेष गाडी शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ रोजी आदिलाबाद येथून सकाळी ५ वाजता सुटेल आणि किनवट, बोधडी बुजरुग, सहस्त्रकुंड, हिमायतनगर, भोकर, मुदखेड, नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, हरंगुळ, धाराशिव, पांगरी, बार्शी टाऊन, कुर्डुवाडी, मोडनिंब, पंढरपूर येथे शनिवारी रात्री २१.४० वाजता पोहोचेल तसेच पुढे सांगोला, जत रोड, कवठेमहांकाळ, आरग मार्गे मिरज येथे रात्री २३.५५ वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७६३४ मिरज-पंढरपूर आदिलाबाद ही विशेष गाडी शनिवार, २५ जुलै २०२६ रोजी मिरज येथून रात्री २१.३० वाजता सुटल आणि आरग, कवठेमहांकाळ, जत रोड, सांगोला, पंढरपूर, मोडनिंब, कुर्डुवाडी, बार्शी टाऊन, पांगरी, धाराशिव, हरंगुळ, लातूर, लातूर रोड, परळी वैजनाथ, गंगाखेड, परभणी, पूर्णा, नांदेड, मुदखेड, भोकर, हिमायतनगर, सहस्त्रकुंड, किनवट मार्गे आदिलाबाद येथे रविवारी (पान ३ वर...)

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# ...तर 'जलबँक' तयार करावी लागेल

भारतीय हवामान विभागाने यंदा जूनअखेरपर्यंत सरासरीपेक्षा सुमारे ३० टक्के कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. एल-निनोच्या परिणामामुळे पर्जन्यमान घटण्याची शक्यता अधिक आहे. अशा परिस्थितीत शेती, पिण्याचे पाणी, उद्योग आणि पर्यावरण या सर्व क्षेत्रांवर त्याचे गंभीर परिणाम होणार आहेत. पर्यावरणीय कामगिरी निर्देशांकात भारत १८० देशांपैकी १७६ व्या क्रमांकावर आहे, ही बाबही चिंताजनक आहे. पाणी हे जीवनाचे मूलभूत अधिष्ठान आहे, असे आपण नेहमी म्हणतो. परंतु आज जगाची आणि विशेषतः भारताची वाटचाल अशा टप्प्याकडे सुरू आहे की, भविष्यात पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधनाचा नव्हे, तर अस्तित्त्वाचा प्रश्न ठरणार आहे. संयुक्त राष्ट्र विद्यापीठाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्लोबल वॉटर बँकरप्सी अर्थात जागतिक पाणी दिवाळखोरी अहवालाने जगाला गंभीर इशारा दिला आहे. जलटंचाई किंवा पाणी संकट या संज्ञाही आता अपुऱ्या ठरत असून, अनेक प्रदेश जलदिवाळखोरीच्या अवस्थेत पोहोचले आहेत. म्हणजेच, पाण्याचा स्रोत इतका ऱ्हास पावला आहे की, तो पूर्वस्थितीत आणणे जवळपास अशक्य बनले आहे. भारतासाठी हा इशारा अधिक धोकादायक आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांमध्ये सर्वांना सुरक्षित पिण्याचे पाणी आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मात्र वास्तव वेगळेच आहे. जगातील २.२ अब्ज लोकांना सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, तर ४ अब्ज लोक वर्षातील किमान एका महिन्यात तीव्र जलटंचाईचा सामना करतात. जगातील तब्बल ७५ टक्के लोकसंख्या जल-असुरक्षित देशांमध्ये राहते. ही आकडेवारी मानवजातीसमोरील संकटाची तीव्रता अधोरेखित करते. भारतात भूजलाचा वापर जगात सर्वाधिक आहे. अमेरिका आणि चीन या दोन्ही देशांच्या एकत्रित वापरापेक्षाही भारतात अधिक भूजल उपसले जाते. ग्रामीण भागातील सुमारे ८५ टक्के लोकांचे पिण्याचे पाणी आणि ६० टक्क्यांहून अधिक शेती भूजलावर अवलंबून आहे. हरितक्रांतीनंतर भूजलामुळे शेतीला स्थैर्य मिळाले, परंतु त्याचबरोबर भूजलाचा अमर्याद उपसा सुरू झाला. आज अनेक भागांतील जलपातळी धोकादायकरीत्या खाली गेली असून, अनेक भूजलसाठे रिकामे होण्याच्या मार्गावर आहेत. देशातील कावेरी, पेन्नार, साबरमती यांसारख्या नदीखोऱ्यांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे, तर कृष्णा खोरेही त्याच दिशेने वाटचाल करत आहे. मोठी धरणे, कालवे आणि नद्यांच्या जोडणीसारखे प्रकल्प महत्त्वाचे असले तरी ते एकमेव उपाय ठरू शकत नाहीत. हवामान बदल, जंगलतोड, जलप्रदूषण, अनियंत्रित शहरीकरण आणि भूजलाचा अतिरेकाने वापर यांचा एकत्रित परिणाम म्हणून आजची परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः शहरांमध्ये कॉंक्रीटीकरणामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही. त्यामुळे भूजलाची पुनर्भरण प्रक्रिया खंडित होत आहे. दुसरीकडे, नद्यांमध्ये आणि तलावांमध्ये सांडपाणी व औद्योगिक प्रदूषण सोडल्यामुळे उपलब्ध पाण्याची गुणवत्ताही झपाट्याने घसरत आहे. जलाशयांचे अतिक्रमण, ओलित क्षेत्रांचा नाश आणि वृक्षतोड यामुळे नैसर्गिक जलचक्रच विस्कळीत झाले आहे. गेल्या काही दशकांत जगभरातील लाखो हेक्टर ओलित क्षेत्रे नष्ट झाली आहेत. मोठ्या तलावांतील पाणीसाठा कमी झाला असून, त्याचा परिणाम कोट्यवधी लोकांच्या जीवनावर होत आहे. ही परिस्थिती केवळ पर्यावरणाची नाही, तर अन्नसुरक्षा, आरोग्य, अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्याचीही आहे. भविष्यात पाण्यावरून संघर्ष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारने जलशक्ती अभियान, जलयुक्त शिवार, अटल भूजल योजना, पावसाचे पाणी साठविणे, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण अशा अनेक योजना सुरू केल्या आहेत. मात्र, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, स्थानिक सहभाग आणि दीर्घकालीन नियोजन यांचा अभाव जाणवतो. केवळ तांत्रिक उपाय किंवा कायदे करून हे संकट टळणार नाही. प्रत्येक गावाने, प्रत्येक शहराने आणि प्रत्येक नागरिकाने पाण्याचे नियोजन आपल्या जीवनशैलीचा भाग बनवले पाहिजे. पाण्याची बचत, पुनर्वापर, सांडपाण्याचे शुद्धीकरण, पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संधारण, जलसाक्षरता आणि शेतीमध्ये कमी पाणी लागणाऱ्या पिकांना प्रोत्साहन ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर भूजल उपशावर कठोर नियंत्रण, नदी-तलावांच्या अतिक्रमणावर कठोर कारवाई आणि जलप्रदूषणाविरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण स्वीकारले पाहिजे. जलदिवाळखोरी हा केवळ अहवालातील शब्द नाही; तो मानवजातीच्या भवितव्याचा इशारा आहे. परिस्थितीमध्ये कोणताही बदल न झाल्यास आपल्याला कालांतराने जलबँक तयार करावी लागेल ज्यामधून पाण्याचा पुरवठा लिटरने नव्हे तर मिलिमीटरमध्ये दिले जाईल. जर आजही आपण जागे झालो नाही, तर उद्याच्या पिढ्यांना आपण संपन्न जलसंपदा नव्हे, तर कोरडी जमीन आणि रिकामे जलाशय यांचाच वारसा देऊ. पाण्याचा प्रत्येक थेंब हा राष्ट्रीय संपत्ती मानून त्याचे संवर्धन करणे ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. अन्यथा, पाण्याशिवाय भविष्य ही कल्पना नसून कटू वास्तव ठरेल.

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज : प्रा. डॉ. एन. डी. पाटील



फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांची आज जयंती. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून, त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव-मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम. ए. आणि एल. एल. बी.चे शिक्षण घेतले.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारा-तून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. (१९६२) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा. डॉ. एन. डी. पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, कॉंग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेली पुस्तके गाजली.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ. एन. डी. पाटील हे एक धडाडीचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा. डॉ. एन. डी. पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# पद्मविभूषण कै. तिजनबाई यांच्या सहवासातील अविस्मरणीय आठवणी





पद्मश्री पद्मविभूषण पांडवानी महाभारत गायिका श्रीमती तिजनबाई यांचे ५ जुलै २०२६ रोजी नुकतेच रायपूर येथे निधन झाले आहे. भारताच्या या महान कलाकारांसोबत गेल्या ३६ वर्षांपासून असलेले माझे व माझ्या कुटुंबियासोबतचे कौटुंबिक नाते व त्यांच्या सहवासातील काही आठवणी व त्यांच्या जीवनावर आधारित दोन शब्द.

'दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती' या उक्तीची प्रचिती पद्मश्री पद्मविभूषण डॉ. तिजनबाई या महाभारतातील पांडवानी गायिकेला भेटल्यानंतर येते. श्रीमती तिजनबाई या महाभारतातील कौरव-पांडवांची कथा, छत्तीसगढ़ी भाषेत गाणाऱ्या भारतातील महान कलाकार होत्या. पांडवांनी म्हणजे कौरव व पांडवाची, महाभारताची कथा ही अभिनय संवाद व कथेद्वारे आपल्या छत्तीसगढ़ी भाषेत पाच-सहा सहकलाकारांव्दारे प्रस्तुत केल्या जाते. ही कथा तिजनबाई आपल्या छत्तीसगढ़ी भाषेत व स्वतःच्या पहाडी खणखणीत आवाजात गात होत्या. तसेच सुंदर अभिनयाद्वारे हातात तंबोरा घेऊन सादर करायच्या.

पांडवांनी सादर करताना त्यांचा तंबोरा, भिमाची गदा, मोरपंखी धनुष्य व तीर बनल्या जायचा. अशा या भारताच्या महान कलाकार श्रीमती तिजनबाईंमुळे भारताचे महाकाव्य व महाभारत व भारतीय लोकपरंपरेला यश प्राप्त झाले. त्यांची व माझी ओळख व नंतर कौटुंबिक नाते जवळपास ३६ वर्षांपासूनचे. भारत सरकारच्या उत्तर-मध्य सांस्कृतिक केंद्र प्रयागराज येथे माझे पती संजयसिंह हे प्रोग्राम डायरेक्टर असताना केंद्राच्या माध्यमातून तिजनबाई यांना सरकारचे कार्यक्रम मिळत गेले.

तिजनबाई यांचा सांस्कृतिक केंद्र प्रयागराज येथे कार्यरत असलेले संजयसिंह यांच्यावर जास्त विश्वास होता. भारत सरकार सांस्कृतिक विभाग हे भारतातील लोककलाकारांचा शोध संवर्धन व प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाम ुळे तेथे कार्यरत असलेले संजयसिंह हे स्वतः तिजनबाईला सांस्कृतिक केंद्र, प्रयागराजमध्ये आणण्यासाठी १९८९, प्रयोगराज तिजनबाईचे गाव गनियारी दुर्ग येथे ८ तास मोटारसायकल चालवून केंद्रातर्फे निमंत्रण देण्यास गेले होते. कारण त्यावेळेस बसेसची व्यवस्था तिजनबाईच्या गावापर्यंत नव्हती. तसेच तिजनबाई यांनी औपचारीक शिक्षण घेतलेले नव्हते. संजयसिंह यांनी तिजनबाई यांना सही करण्यास शिकविले, अशा अनेक आठवणी तिजनबाईच्या आहेत.

वयाच्या १३ वर्षांपासून महाभारतातील विविध प्रसंग त्या गायच्या, लहानपणी त्यांचे आजोबा पांडवाने गाताना ते ऐकायच्या व ते पाहून त्या स्वतः पांडवानी गायला शिकल्या. लग्न झाल्यानंतर त्यांना पतीकडून ही कला सादर करण्यासाठी विरोध झाला. पण त्यांनी स्वतःचे घर सोडले, पण पांडवानी गायचे नाही सोडले. आपल्या लहान तीन मुलांना घेवून त्या घराबाहेर पडल्या व आपली कला व कार्यक्रम गावोगावी करू लागल्या. हे कार्यक्रम करीत असताना त्यांना भारत भवन, भोपाळ येथे कार्यक्रमासाठी बोलाविले गेले. त्यावेळेस प्रसिध्द रंगकर्मी बी तनवीर हे त्यांच्या महाभारत गायनाने प्रभावित झाले व त्यांनी त्यावेळेचे प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांच्यासमोर कार्यक्रम सादर करण्यासाठी बोलाविले. त्यानंतर निदेशक श्याम बेनेगल यांनी टी. व्ही. सिरीयल भारत एक खोजमध्ये त्यांना स्थान दिले. त्यानंतर त्यांच्या पांडवानी गायननामुळे तिजनबाई जगप्रसिद्ध झाल्या.

तिजनबाई व त्यांचे साथी कलाकार व विविध १०० कलाकारांसोबत सांस्कृतिक केंद्राच्या पर्वतीपर या कार्यक्रमात मी त्यांच्यासोबत उत्तराखंडातील बद्रीनाथ हेमकुंड, जोशी मठ, कर्णप्रयाग, देवप्रयाग, रुद्रप्रयाग, चमुली हरिव्दार, आलमोडा, राणीखेत, नैनीताल ईत्यादी ठिकाणी चैन प्रोग्राममध्ये एक महिन्याच्या कार्यक्रमात मी सहभागी असायचे. त्याचप्रमाणे केफ फेस्टीवल २००० कन्याकुमारी येथे समुद्राच्या किनारी भारत सरकार-तर्फे आयोजित केलेल्या त्यांच्या कार्यक्रमासाठी मी देखील सहभागी झाले होते. हा कार्यक्रम पंधरा दिवसांचा होता. अशा विविध सरकारी कार्यक्रमात मी त्यांच्या सोबत असायची.

महाभारतातील संपूर्ण १८ प्रसंगाचे वर्णन पद्मभूषण तिजनबाई करायच्या. त्यांच्या अत्यंत प्रभावशाली व्यक्ती-मत्त्वाबरोबरच तीक्ष्ण बुध्दिमता, अलौकिक प्रतिभा व अंगभूत कलेला सादर करण्याची अप्रतिम क्षमता, अभिनय पाहुन त्यांना अशिक्षित म्हणणे योग्य ठरणार नाही, कारण त्यांनी त्यांच्या कलेद्वारे अभिनयामुळे व पांडवानी गायनांमुळे भारताचे नाव जगभरात केले आहे.

मूळच्या मध्यप्रदेशातील दुर्ग जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या तिजनबाईनी शाळेतील औपचारिक शिक्षण जरी घेतले नसले तरीही १९८५-८६ ला पॅरिस येथे झालेल्या भारत महोत्सवात भारताचे प्रतिनिधीत्व केले. महाभारताची कथा पांडवानीद्वारे गाऊन भारताच्या संस्कृतीची ओळख अख्या जगाला करून दिली. त्यांच्या अप्रतिम कलेची दखल भारत सरकारने घेतली व त्यांना १९८८ साली भारत सरकारने पद्मश्रीने सन्मानित केले.

तसेच त्यांना संगित नाटक अकॅदमी आवार्ड १९९२ साली, १९९४ साली श्रेष्ठ कला आचार्य अवार्ड, १९९८ साली देवी अहिल्या आवार्ड, १९९९ साली इसुरी आवार्ड, ३ एप्रिल २००३ रोजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम व्दारा पद्मभूषणने सन्मानित केले आहे. तसेच २०१८ छत्तीसगढ़ रत्न, २०१९ ला पद्मविभूषण आवार्ड राष्ट्रपतीव्दारे प्रदान करण्यात आला. २ मे २००३ ला छत्तीसगढ़ सरकार व खैरागढ विद्यापीठाव्दारे डिलीटने सन्मानित केले. या व्यतिरिक्त मध्यप्रदेश सरकारचे तुलसी आवार्ड, महिला नवरत्न, कला शिरोमनी आवार्ड, तसेच आदित्य विक्रम बिर्ला कला शिखर सन्मान, २००३ ला मुंबई येथे सन्मानित केले. भारताव्यतिरिक्त त्यांनी विदेशातील फ्रान्स, स्वित्झरलँड, जर्मन, लंडन, माल्टा, साइप्रसटर्कि, युरोप, इटली, रमन, मॉरिशस या व्यतिरिक्त जगातील ४० च्या वर देशात त्यांनी कार्यक्रम सादर केले आहेत. आतापर्यंत १५००० च्यावर कार्यक्रम प्रस्तुत केलेले आहेत. नांदेड येथे देखील पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने लोहडी संक्रांत महोत्सवानिमित्त १३ जानेवारी २००८ ला त्यांनी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात नांदेडच्या कला रसिकांसाठी भारताच्या या महान पांडवानी गायिकेने आपली कला सादर केली होती.

यावेळेस त्यांनी द्रौपदी चिरहरणाचा प्रसंग सादर केला होता तो अविस्मरणीय राहिला. या प्रासंगी द्रौपदीला देवी द्रोपदी असे संबोधताना महाभारतातील व्यक्तीविषयी त्यांच्यात असलेला प्रचंड आदर व्यक्त होत होता. त्यानंतर तीन-चार वर्षापूर्वी मी व माझे कुटुंबीय दुर्ग येथे त्यांना भेटण्यासाठी गेलो होतो. तेथे गेल्यानंतर त्यांनी विविध देशातील सरकारतर्फे गौरविलेले त्यांचे जवळ जवळ १०० च्या वर सर्टिफिकेट तसेच सन्मानचिन्ह आम्हाला दाखविले व तो वेळ आम्ही सर्वांनी प्रेमाने त्यांच्या सोबत घालविला, ही आमची शेवटची भेट ठरली. अशी ही भारताची महाभारत गाणारी लोककलाकार दिनांक ०५ जुलै २०२६ रोजी ब्रम्हलिन झाल्या. शासकीय इतमानाने राजकीय सन्मानाने त्यांचा अंत्यविधी सरकारतर्फे करण्यात आला. अशा या भारताच्या महान कलाकाराला भावपूर्ण शब्द सुमनांजली. त्यांच्या स्मरणार्थ छत्तीसगढ सरकारने पांडवानी विरासत राज्य सन्मानची स्थापना करण्याचे घोषित केले आहे. हा सन्मान पांडवानी कला क्षेत्रात दिला जाणार आहे. तसेच तिजनबाईचे गाव गनयारीला कला ग्रामच्या रुपात विकसित करण्याची घोषणा सरकारने केली आहे. तसेच त्यांची तंबोरा ज्याव्दारे त्या स्टेजवर कार्यक्रम प्रस्तुत करायच्या ती तंबोरा महंत घासीदास संग्रहालय रायपूर येथे सुरक्षित व जनतेसाठी प्रदर्शित करण्यासाठी ठेवणार असल्याचे छत्तीसगढ़ सरकारने घोषित केले आहे.

शेवटी त्यांनी त्यांच्या शब्दात गायिलेली महाभारतावरील मालिकेतील ही रचना जीवनाविषयी खूप काही सांगून जाते.

चोला मोरी माटी,
काया मोरी माटी,
भाई बंधू कुटूंब
कबिला जियत
भरके साथी
चोला मोरी माटी
काया मोरी माटी,
भिष्म, द्रोण, करण,
दुःशासन, बने बने के साथी
चोला मोरी माटी
काया मोरी माटी.

-डॉ. अनुराधा शिंदे सिंह
नांदेड
मो. ८८३०९९७३०७

# सद्वर्तनाने जीवन मंगलमय बनवा

आपल्या चुका जगाला सांगून मला माझ्या चुकीच्या कर्माचा किती पश्चाताप झाला आहे. याची कबुली आपण जगासमोर वारंवार देत राहिलो तर त्यामुळे आपल्या चुकांचे परिमार्जन होईल असे समजणारे मूढ बुद्धीचे महाभाग पुष्कळ असतात. आपल्या अयोग्य कृत्याची शिक्षा आपल्याला भोगावीच लागणार आहे. त्याबद्दल आपल्या मनाला कबुली देऊन त्यानंतर उत्तम कर्म करण्याचा प्रयत्न त्या व्यक्तीकडून झाला पाहिजे. जे बलशाली व सामर्थ्यवान असतात, जगाला त्यांच्याबद्दल आकर्षण असते. आजपर्यंत तरी असेच घडत आले आहे. दुर्बलांचे रडगाणे, लाचारी जगाच्या आकर्षणचा विषय नसतो. त्यांच्याविषयी लोकांच्या मनात प्रेमभाव नसतो. त्या प्रतिकूल परिस्थितीतून बाहेर पडण्याची त्याची जिद्द, मेहनत व इच्छाशक्ती असेल तर मदतीचे हातही समोर येतील. प्रसंगी अवहेलना उपेक्षा व मानहानीचे डोंगरही पार पाडण्याची तयारी ठेवून, उच्चतम ध्येयासाठी त्यागाची व समर्पणाची ज्यांची तयारी असते त्यांना जगातील कोणतीही शक्ती रोखू शकत नाही. दिव्य ज्ञाना-ची प्राप्ती झालेली माणसे कोणत्याही कामाला कमी लेखत नाहीत. कोणतेही काम कमी प्रतीचे असू शकत नाही. कामाची श्रेणी ठरवून त्या व्यक्तीची योग्यता ठरविणारी माणसे कोत्या म नाची असतात. मनुष्य जन्माचा अर्थच त्यांना कळालेला नसतो.

कार्य कोणत्या प्रकारचे, हे महत्वाचे नसून ते ते किती तत्परतेने व कौशल्याने संबंधित व्यक्ती पार पाडते ते महत्वाचे. सर्व कार्य मानवी जीवन व्यवस्थेसाठी महत्वाची आहेत.त्यामुळे कार्यात भेद कसा होऊ शकतो?कार्य करताना त्या व्यक्तीची तत्परता, कार्यमग्नता, कार्याविषयीचे प्रेम,त्यामधील सेवाभाव अशा अनेक गोष्टी महत्वाच्या असतात. प्रत्येक कर्तव्य पवित्र आहे. कर्तव्यनिष्ठा हा ईश्वरपूजेचा श्रेष्ठ प्रकार आहे. त्यामुळे ईश्वर पूजेच्या नावाखाली चाललेल्या मंदिरातील व्यर्थ बडबडीपेक्षा प्रत्यक्ष उन्हात घाम गाळणारा कष्टकरी श्रेष्ठ. हे मान्य करणारी व्यवस्था तयार होईल,त्यावेळेस ईश्वरपूजेच्या नावाखाली या व्यवस्थेची फसवणूक करणारा उच्चवर्णीय आपोआपच उघडा पडेल असे मत स्वामीजींनी व्यक्त केले आहे.आपले आत्मबल वाढविण्यासाठी आपली कार्यनिष्ठा महत्वाची. कार्यनिष्ठेमुळे मनुष्य बलसंपन्न होतो. समाज व राष्ट्रालाही बलसंपन्न बनवितो. ज्या अर्थव्यवस्थेत श्रमाचा मोबदला देतांना त्याचे प्रत्यक्ष काम मोजले जाते. तेंव्हा तो श्रमिक स्वतःला न्याय देतो. कार्यतृप्तीचा आनंद घेतो.त्याबरोबरच तो समाजाला व राष्ट्राला न्याय देत असतो. त्या बरोबरच त्याच्या श्रमाचे योग्य मूल्य देणारा मालकही तेवढेच समाधान प्राप्त करीत असतो. तिथे शोषक आणि शोषताची व्यवस्था तयार होत नाही. न्यायची व्यवस्था तयार होते.जिथे न्यायची व्यवस्था तयार होते, तिथेच खरे ईश्वरी कार्य सुरू असते, बाकी सारे अवडंबर. जगभुला वणीचे अमानवी प्रयोग.जिथे दुर्बलांसोबत न्याय नाही. तिथे मानवीय कार्य होण्याची शक्यताही धूसर होत जाते.सत्कार्याचा भास निर्माण करून दुष्कृत्य करणारी घातकी व्यवस्था फार मोठ्या प्रमाणात सर्वत्र फोफावते. त्यांचा आनंदही तात्कालिक असतो. तिथे कार्यतृप्तीआनंद नाही. मूल्यप्राप्तीचा आनंद तिथे महत्वाचा असतो.मी कसे व कोणत्या मार्गाने ते प्राप्त केले आहे, हे त्यांच्यासाठी महत्वाचे नसते.ते प्राप्त करून घेणे त्यांना महत्वाचे असते.तिथे नितीमुल्याचा ऱ्हास झालेला असतो.ते त्या व्यक्तीचे किंवा व्यवस्थेचे कर्मफळ नसून आपली स्वार्थी मतलबी वृत्तीमुळे मी इतरांचा घास माझ्या घशात कसा घातला.

स्वामीजी म्हणतात, असे मोबदल्यासाठी काम करणारेच सर्वत्र दिसतात,पण या कामावर मी प्रेम करतो म्हणून मी हे काम करतो म ला कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा नाही.असे बोलून प्रत्यक्ष तसेच वागणारा जो कोणीही महाभाग असेल त्याच्या दर्शनासाठी कोसो दूर मी हाताने व गुढघ्याने सरपटत जाईल.द्रव्य प्राप्ती,सत्ता संपादन किंवा अन्य काही हेतू हा प्रत्येकाचा हेतू असतो.स्वार्थ हेतू मनात ठेवून जेंव्हा मनुष्य काम करतो तेंव्हा तो उद्देश मनाला दुःखी बनवितो, असे स्वामीजी सांगतात.सद्यस्थि ती तर अशी झाली आहे स्वार्थाशिवाय सर्वांना दुसरे काहीच दिसत नाही.प्रत्येक कामाचे मूल्य हवे आहेच आणि ते श्रमम ूल्यापेक्षा अधिक हवे आहे किंवा काम न करताच ते हवे आहे यासाठी वेगवेगळे ऑनलाइन उपक्रम आपले अनेक महान बांधव राबवित असतात. एका अर्थाने बरे झाले आज स्वामीजी नाहीत, नसता त्यांनाही ऑनलाईन पिढीने अवैध मार्गाने पैसे कसे मिळ वावे याचे प्रशिक्षण दिले असते. वर्तमानस्थितही आपल्या जीवनात नीतीमत्ता जोपासणारे युवक आहेत, त्यांचे प्रमाण किती?पैसा मिळविण्यासा ठी वाट्टेल ते!' हे आमचे ब्रीद वाक्य झाले आहे का?हा प्रश्न युवकांनी आपल्या मनाला विचारला पाहिजे. स्वार्थी माणसे त्यांच्या जीवनात किती आनंदी झाले?किती सुखी झाले? याचाही अभ्यास करून युवापिढीने आपल्या मनाला प्रश्न विचारले पाहिजे.जेंव्हा 'आपुला संवाद आपणाशी' होऊ लागेल, तेंव्हाच युवा पिढीच्या आत्मपरिक्षणाला प्रारंभ होईल. हे आत्मपरीक्षण प्रत्येकासाठी खूप महत्वाचे.

अतिरिक्त संपत्तीचा हव्यास प्रत्येकाला होतो. बदलत्या परिस्थितीनुसार प्रत्येकाच्या वाढत्या गरजांचा विचारही झाला पाहिजे,हे कुणीही नाकारू शकणार नाही,पण बदलते आर्थिक धोरण उद्योजकांच्या लाभासाठी आपल्या गरजा जाणीवपूर्वक वाढवीत आहे का? प्रत्येक वस्तू व सेवेचे महत्व जाहिरातबाजीतून आमच्या मनावर प्रचंड प्रमाणात बिंबविले जाते की त्या वस्तू व सेवेचे आकर्षण आपल्याला वाटलेच पाहिजे. या ठिकाणी आपण किती तटस्थ भूमिका घेऊ शकतो,हे खूप महत्वाचे. मग आपल्याला आपल्या गरजा भागविण्यासाठी अतिरिक्त उत्पन्न व संपत्तीचा हव्यास वाटणार नाही. त्यातून येणारे वैफल्य, निराशा आमच्या वाट्याला येणार नाही. आपल्या चुकांची वारंवार कबुली देऊन पाश्चातापाची वेळ येणार नाही. सदविचाराने सद्वर्तनाने आपले जीवन मंगलमय बनविणे शक्य होईल.

-प्रा. वसंत गिरी
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करूया -कुलगुरू डॉ. मनोहर चासकर



**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्यार्थी हा विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या सर्व शैक्षणिक उपक्रमांचा केंद्रबिंदू असून, त्यांच्या सर्वांगीण हितासाठी विद्यापीठ सदैव कटिबद्ध आहे. विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये अधिक प्रभावी समन्वय निर्माण करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अधिक उज्ज्वल करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात सोमवारी (दि.१३ जुलै, २०२६) आयोजित महाविद्यालयांच्या विविध प्रशासकीय व शैक्षणिक अडचणींच्या आढावा बैठकीत उपस्थित प्राचार्यांना मार्गदर्शन करताना अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर त्यांच्यासमवेत प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, मानव्य विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग खडके, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. चासकर म्हणाले की, महाविद्यालयांच्या स्तरावर जशा विविध प्रशासकीय व शैक्षणिक अडचणी असतात, त्याचप्रमाणे विद्यापीठालाही मनुष्यबळ, परीक्षा नियोजन, प्राध्यापक मान्यता, अनुदान, दीक्षांत समारंभ तसेच विविध प्रशासकीय प्रक्रियांशी संबंधित अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. मात्र, या सर्व समस्यांवर नियोजनबद्ध आणि सकारात्मक पद्धतीने उपाययोजना करण्यात येत आहेत.

ते पुढे म्हणाले की, काही विषय राज्य शासनाकडे पाठविणे आवश्यक असते, काही विषय विद्यापीठाच्या विद्या परिषदेसमोर मांडावे लागतात, तर काही विषय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर अंतिम निर्णयासाठी ठेवावे लागतात. त्यामुळे प्रशासकीय प्रक्रियेस काहीसा कालावधी लागत असला तरी महाविद्यालयांकडून प्राप्त होणाऱ्या अडचणी शक्य तितक्या कमी वेळेत सोडविण्यास विद्यापीठ प्राधान्य देत आहे.

बैठकीदरम्यान उपस्थित प्राचार्यांनी महाविद्यालयीन स्तरावर भेडसावणाऱ्या विविध समस्या, सूचना व अपेक्षा याविषयी कुलगुरूंशी मनमोकळा संवाद साधला. या चर्चेतून अनेक विधायक सूचना समोर आल्या.

प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी प्राचार्यांनी मांडलेल्या सर्व सूचना व मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर लवकरात लवकर आवश्यक निर्णय घेतले जातील, अशी ग्वाही दिली.

बैठकीचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांनी केले.

# विश्वकर्मा समाजातील विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन

## नांदेड येथील विश्वकर्मा सेवा संघाचा पुढाकार

**लोहा (प्रतिनिधी)–** विश्वकर्मा सेवा संघ नांदेडच्या वतीने रविवार, दि. १९ जुलै रोजी दुपारी १२:३० वाजता शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह गुरुगोविंद सिंघजी स्टेडियम नांदेड येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सामाजिक कार्यक्रमाला समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक तथा देगलूर न. प. चे माजी नगरसेवक दीपक शहाणे यांची उपस्थिती राहणार आहे तर कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर येथील जीएसटीचे डेप्युटी कमिशनर निलेश शेवाळकर यांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ कवी तथा साहित्यिक देविदास फुलारी, विठ्ठलराव पांचाळ व मुदखेड नगरपालिकेच्या नगरसेविका सौ. प्रेमलाबाई गोपीनाथराव पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

विश्वकर्मा सेवा संघ नांदेडच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. हे वर्ष ११ वे असून, विश्वकर्मा समाजातील गुणवत्ता वाढवावी, स्पर्धेच्या युगात समाजातील विद्यार्थी अव्वल यावेत याकरिता गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी इयत्ता दहावीत ७०% व बारावीत ७०% वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीटमध्ये ५०० पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले विद्यार्थी तसेच जेईई व सीईटी मध्ये ९०% पेक्षा जास्त गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी विश्वकर्मा सेवा संघाच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

याच सोहळ्यात समाजातील गुणवंत व गरजवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. त्यात दहावी व बारावीतील गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय अशा सहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. यात शिल्पकार गुरुवर्य सोपानकाका शूर शिष्यवृत्ती प्रथम ११००० रुपये त्याचे वाटप खालीलप्रमाणे दहावी १.५५००, बारावी १.५५०० अशी दोन गुणवंत विद्यार्थ्यांना एकूण ११००० शिष्यवृत्ती दिली जाते.

कै. धोंडिबाराव नागोबा पोलादवार शिष्यवृत्ती द्वितीय दहावी १.३५००, बारावी १.३५०० अशी दोन गुणवंत विद्यार्थ्यांना ७००० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते.

कै. किशनराव मारुतीराव उजळंबकर शिष्यवृत्ती तृतीय बारावी १.११०० रुपये, दहावी १. ११०० अशा दोन गुणवंत विद्यार्थ्यांना रुपये २२०० शिष्यवृत्ती दिली जाते. या सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना कै. लक्ष्मणराव शिवलिंगराव देशमुख अंबुलगेकर यांच्या स्मरणार्थ स्कूलबॉग दिल्या जातात.

याशिवाय मानव कल्याणासाठी विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना समाजभूषण पुरस्कार तर अत्यंत कठीण परिस्थितीत किंवा पतीच्या निधनानंतरही आपल्या पाल्यांना उच्च शिक्षित करुन स्वतः च्या पायावर उभे करणाऱ्या मातांना हिरकणी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

विश्वकर्मा समाजातील समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहून गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन विश्वकर्मा सेवा संघाच्या सर्व स्वयंसेवकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वारकऱ्यांच्या सेवेसाठी माऊली मित्र मंडळाकडून काळज येथे १५ ते १७ जुलैदरम्यान मोफत सेवा शिबीर

## ▶ अल्पोपहार, महाप्रसाद, आरोग्य सेवा व पायांची मोफत मसाज सेवा

**नांदेड (प्रतिनिधी)–** आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी माऊली मित्र मंडळाच्या वतीने सातारा जिल्ह्यातील काळज (ता. फलटण) येथे १५, १६ आणि १७ जुलै दरम्यान मोफत सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. 'सेवा हीच ईश्वरभक्ती'या भावनेतून वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

शिबिरामध्ये वारकऱ्यांसाठी सकाळी नाश्ता, चहा, लहान मुलांसाठी व वारकऱ्यांसाठी दुधाची व्यवस्था, शुद्ध व सात्त्विक महाप्रसाद, तसेच मोफत आरोग्य तपासणी व प्रथमोपचार सुविधा उपलब्ध असतील. आपत्कालीन परिस्थितीसाठी २४ तास रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात येणार आहे.

सलग पायी चालल्यामुळे होणारा शारीरिक थकवा दूर करण्यासाठी सेवाभावी कार्यकर्त्यांकडून अभ्यंग सेवा (फूट मसाज) देण्यात येणार असून,



वारकऱ्यांना आराम मिळावा हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

वारी ही परंपरा नाही तर आमचा श्वास आहे, हा संदेश देत माऊली मित्र मंडळाने सर्व वारकरी बांधवांना या सेवा शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही सेवाभावातून हा उपक्रम राबविण्यात येत असून, वारकऱ्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याची भावना मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# गुरुद्वारा सचखंड बोर्डाकडून कंत्राटदार कंपनीला ताकीद

## ३ दिवसांत मशनरी आणि कागदपत्रे सादर करण्याचे आदेश; जगदीप नंबरदार यांच्या तक्रारीची दखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील प्रसिद्ध तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब गुरुद्वारा बोर्डाने हाऊसकीपिंग आणि व्यवस्थापनाचे कंत्राट घेतलेल्या मेसर्स के. झेड. सिक्युरिटीस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला कडक शब्दांत ताकीद दिली आहे. काम सुरू होऊनही निविदेतील अटींनुसार आवश्यक मशनरी आणि कागदपत्रे वेळेत जमा न केल्यामुळे बोर्डाचे अधीक्षक यांनी हे कारणे दाखवा वजा कडक अंमलबजावणीचे पत्र जारी केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सदर कंपनीला १ मे २०२६ पासून गुरुद्वारा परिसर आणि परिसरातील हाऊसकीपिंग, फॅसिलिटी मॅनेजमेंट आणि मेंटेनन्स सेवांचे कंत्राट देण्यात आले आहे. सेवा सुरू झाल्या असल्या तरीही निविदेत नमूद केलेली आवश्यक यंत्रसामग्री आणि उपकरणे अद्याप प्रत्यक्ष जागेवर तैनात करण्यात आलेली नाहीत, ही गंभीर बाब गुरुद्वारा प्रशासनाच्या निदर्शनास आली आहे.

गुरुद्वारा बोर्डाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत कंपनीला हे पत्र मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत खालील बाबींची पूर्तता करण्याचे आदेश दिले आहेत. परफॉर्मन्स बँक गॅरंटी: वार्षिक कंत्राट मूल्याच्या ५ टक्के इतकी सुरक्षा रक्कम जमा करणे बंधनकारक आहे.

कंत्राटांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची नावे, पदनाम, ईपीएफ योगदान तपशील, नवीन ईपीएफ चालान आणि ईसीआरसह ईपीएफ नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करणे, यंत्रसामग्रीची यादी व छायाचित्रे: प्रत्यक्ष जागेवर तैनात असलेल्या सर्व हाऊसकीपिंग मशनरी, उपकरणे, साधने आणि साहित्याची छायाचित्रांसह संपूर्ण यादी जोडणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

प्रशासनाच्या इशारा निविदेतील अटींचे त्वरित आणि काटेकोर पालन न केल्यास कंत्राटदार कंपनीवर दंडात्मक कारवाई केली जाईल, तसेच निविदेतील नियमांनुसार पुढील कडक पावले उचलली जातील. या पत्राला 'अत्यंत तातडीचे' म्हणून घोषित करण्यात आले असल्याचे एका पत्रकानुसार कळविण्यात आले आहे.

# हळद पिकाचा विमा काढण्यास मुदतवाढ देण्याची मागणी

**लोहा (प्रतिनिधी)–** हळद पिकाचा विमा काढण्यास मुदतवाढ द्यावी, अशी मागणी लोहा न. प. चे गटनेते भास्करराव पाटील पवार यांनी शासनाकडे शेतकऱ्यांच्या वतीने केली आहे.

गटनेते भास्करराव पाटील पवार यांनी पुढे असे नमूद केले की, लोहा तालुक्यात यंदा २०२६, मधील मान्सूनचा पाऊस चांगला झाला नसल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले आहे. नदी, नाले, विहिरी कोरड्या पडल्या आहेत. माणसासहित जनावरांना पाणी नाही. पाणी टंचाईला जनता तोंड देत आहे आणि त्यामध्ये हळद पीक विमा पेरा असला तरी आणखी अनेक शेतकऱ्यांनी हळद लागवड केली नाही आणि त्यातच पिकविमा भरण्यासाठी शेवटचा दि.१४ जुलै २०२६ आहे. तेव्हा शासनाला विनंती आहे की, हळद पिकविमा भरण्यासाठी शेतकऱ्यांना मुदत वाढ द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांच्यावतीने लोहा न. प. चे गटनेते भास्करराव पाटील पवार यांनी शासनाकडे केली आहे.

# सासवड येथे दिंडीतील वारकऱ्यांसाठी गुडघे दुखी कंबर दुखीवर दोन दिवसांचे उपचार शिबीर

## डॉ. पवार पितापुत्र आणि टिमद्वारे तीन हजार वारकऱ्यांवर मोफत उपचार

**नांदेड (प्रतिनिधी)–** गेल्या सात वर्षांपासून सुरू असलेली संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्यावतीने वारकऱ्यांच्या गुडघे दुखी, कंबर दुखी आजारावर सासवड येथे डॉ. अवधुत पवार, डॉ. संभाजी पवार हे पिता-पुत्र आणि त्यांचे सहकाऱ्यांच्या मदतीने दोन दिवसांचे सासवड येथे मोफत उपचार शिबीर घेऊन जवळपास तीन हजार वारकऱ्यांवर उपचार करण्यात आले.

हडपसर ते सासवड ३२ कि.मी. चा दिवेघाट मार्गे प्रवास म्हणजे या वारीतील सर्वात खडतर प्रवास. या वारीत वृद्ध महिला, पुरुष ज्ञानेश्वर माऊलीच्या नावाचा जयघोष करत पाई चालतात. त्यामुळे त्यांना गुडघे दुखी व कंबर दुखीचा त्रास होतो. आपले



सामाजिक कर्तव्य समजून गेल्या सात वर्षांपासून डॉ.पवार पिता-पुत्र अशा वारकरी रुग्णावर सुजोक अकुप्रेसर आणि मसाजद्वारे मसाज करून तो त्रास कमी करण्याचा प्रयत्न करतात.

दर वर्षीप्रमाणे याही वर्षी सासवड येथे दि. ११ आणि १२ जुलै २०२६ रोजी ही सेवा देण्यात आली. यावेळी डॉ. अवधुत पवार, डॉ. संभाजी पवार, सौ. कान्होपात्रा पवार यांच्यासोबत नरेन्द्रसिंघ ग्रंथी, प्रकाश सावंत, सतीश बागल, विलास बागल, एकनाथ बागल, कान्हा देशमुख यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या शिबिरासाठी सासवड नगरपरिषदेचे नगरसेवक मयूर भैया चौखंडे, शरद चौखंडे, संतोष चौखंडे यांचे सहकारी कार्यकर्ते यांच्या स्टेज आणि इतर व्यवस्था पुरवण्यात आल्या.

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात ९ ऑगस्ट रोजी नांदेड शहरात निघणार मोर्चा

## ५९ अनुसूचित जातींमधील बांधवांचा बैठकीत निर्धार

**नांदेड (प्रतिनिधी)–** अनुसूचित जातींच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या बैठकीत उपस्थित विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींनी प्रस्तावाविरोधात अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, नांदेडच्या वतीने ११ जुलै रोजी सकाळी ११ वाजता यशोरुण, मंगल कार्यालय पूर्णा रोड नांदेड येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत उपवर्गीकरणाच्या प्रस्तावावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच ९ ऑगस्ट रोजी रोजी नांदेड येथे होणारा जिल्हास्तरीय महामोर्चा अभूतपूर्व करण्याचा निर्धार करण्यात आला.

या बैठकीला अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा श्रामनेर प्रशिक्षण केंद्र प्रमुख भदंत पंय्याबोधी थेरो, तसेच भदंत विनयबोधी महाथेरो, भदंत पय्यारत्न थेरो, भदंत शिलरत्न थेरो, भदंत सुबुती थेरो, भदंत बुध्दभूषण तसेच भिख्खू संघ, समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा, उपवर्गीकरण विरोधी कृती समन्वयन समिती यांची उपस्थिती होती.



अनुसूचित जातीतील आंबेडकरवादी पक्ष, संघटना, पक्ष व संघटनेचे पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते, उपासक व सर्व अनुसूचित जातीतील ५९ जातीतील सर्व सुजाण नागरिक उपस्थित होते. सदरील महामोर्चाला जवळपास ५ लाख लोक उपस्थित राहतील अशी अपेक्षा आयोजकाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

अनुसूचित जातींच्या घटनात्मक अधिकारांवर कोणताही आघात सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींच्या एकात्मतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत संविधानाने दिलेल्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना धक्का पोहोचेल, अशी भूमिका मांडण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने उपवर्गीकरणाच्या दिशेने कोणतीही घाईगडबडीची पावले उचलू नयेत, संबंधित समाजघटकांशी व्यापक चर्चा करावी आणि निर्माण झालेला संभ्रम दूर करावा, अशी ठाम मागणी बैठकीत करण्यात आली. बैठकीत नांदेड शहर व प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक गावातून मोठ्या संख्येने महिला, युवक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी नांदेडच्या महामोर्चात सहभागी व्हावे, यासाठी व्यापक जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. वेगवेगळ्या समित्या स्थापन करून प्रत्येक भागातून वाहनांची व्यवस्था करून हजारोंच्या संख्येने नागरिकांना मोर्चात सहभागी करण्यासाठी नियोजन आखण्यात आले. उपस्थितांनी संविधान, सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेच्या मूल्यांच्या संरक्षणासाठी लोकशाही व संविधानिक मार्गाने संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. शासनाने समाजात मतभेद निर्माण करणाऱ्या निर्णयाऐवजी विश्वास संवाद आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणारी भूमिका स्वीकारावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**पान १ वरून...**

**जिल्हा परिषदेचा डिजीटल...**

प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा कार्यक्रम प्रमुख कुलदीप जोशी समन्वयकाची जबाबदारी सांभाळत आहेत. तर सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांनीही सर्व व विभागप्रमुख व अधिकाऱ्यांना टपाल व पत्रव्यवहार ई- ऑफिसद्वारेच करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ई- ऑफिस प्रणालीमुळे कागदाचा वापर आणि छपाईचा खर्च कमी होण्यासच मदत होत असून कार्यालयीन कामकाजाला गती मिळत आहे. ई-फाईल कोणाकडे किती दिवस प्रलंबित आहे, याचा ऑनलाईन मागोवा घेता येत असल्याने पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढत आहे. तसेच डिजिटल स्वरूपात कागदपत्रे सुरक्षित राहणे, जुन्या फाईल्स सहज शोधता येणे, डिजिटल स्वाक्षरीद्वारे मंजुरी देणे आणि आवश्यकतेनुसार दूरस्थ पद्धतीनेही कामकाज करणे शक्य होत आहे. यामुळे निर्णय प्रक्रियेला वेग येऊन नागरिकांना अधिक जलद आणि कार्यक्षम सेवा उपलब्ध होण्यास मदत होत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

------------

**आषाढी एकादशीनिमित्त...**

दुपारी ३ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०७६३५ अकोला-पंढरपूर ही विशेष गाडी शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी अकोला येथून शुक्रवारी सकाळी ११ वाजता सुटेल आणि वाशिम, हिंगोली, बसमत, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, पानगाव, लातूर रोड, उदगीर, भालकी, बिदर, झहीराबाद, विकाराबाद, तांदूर, सेरम, चित्तापूर, वाडी, कलबुर्गी, सोलापूर, कुर्डुवाडी, मोडनिंब मार्गे पंढरपूर येथे शनिवारी ९.२० वाजता पोहोचेल. दक्षिण मध्य रेल्वेने आषाढी एकादशी यात्रेसाठी प्रवाशांनी या विशेष रेल्वेगाड्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# 'यशवंत' मध्ये 'माय भारत' विद्यार्थी विशेष नोंदणी अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद




**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत कार्यरत माय भारत केंद्र, जिल्हा युवा अधिकारी कार्यालय व यशवंत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात 'माय भारत विद्यार्थी नोंदणी अभियान' उत्साहात पार पडले.

या अभियानांतर्गत पात्र विद्यार्थ्यांना माय भारत पोर्टलवर नावनोंदणी करून राष्ट्रीय स्तरावरील विविध युवा उपक्रमांशी जोडण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. हा उपक्रम विकसित भारत २०४७ या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्र-कुलगुरू तथा प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी माय भारत या उपक्रमामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. या पोर्टलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नेतृत्व विकास, स्वयंसेवा, कौशल्यविकास, इंटर्नशिप, प्रशिक्षण, सामाजिक उपक्रम आणि रोजगारक्षमतेच्या विविध संधी उपलब्ध होत असून, प्रत्येक विद्यार्थ्याने या राष्ट्रीय अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख मार्गदर्शिका सुश्री अशनी अनिल कानकटे, जिल्हा युवा अधिकारी, माय भारत, नांदेड (युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार) उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना माय भारत पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवून सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच नोंदणी केल्यानंतर विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्वयंसेवी उपक्रम, प्रशिक्षण कार्यशाळा, इंटर्नशिप, नेतृत्व विकास कार्यक्रम, डिजिटल प्रमाणपत्रे, विविध शासकीय विभागांसोबत काम करण्याच्या संधी, तसेच विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम, विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग, पर्यावरण संवर्धन, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन, सामाजिक विकास अशा अनेक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी विद्यार्थ्यांच्या शंका निरसरण करण्यात आले.

प्रास्ताविक डॉ. साईनाथ बिंदगे यांनी केले तर सूत्रसंचालन बी. ए. तृतीय वर्षातील कोमल कागदेवाड यांनी केले. आभार ज्ञानेश्वर डाके यांनी मानले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. शिवाजी सूर्यवंशी, डॉ. रत्नमाला म्हस्के, डॉ. कैलाश इंगोले तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धनेगाव येथील तलाठी हटवा

## माजी जि. प. सदस्य मनोहर शिंदे यांची मागणी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील धनेगाव येथील तलाठी सज्जाचे तलाठी डी. एस. सोनटके हे शेतीची व इतर कामे वेळेवर पूर्ण करीत नाहीत, उलट ईतर कामांसाठी पैशाची मागणी करत आहेत. या ठिकाणी तत्काळ नवीन तलाठ्याची नेमणूक करावी, अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे केली.

नांदेड तालुक्यातील मौजे धनेगाव तलाठी सज्जा आहे. या सज्जा अंतर्गत बळीरामपूर ही ग्रामपंचायत आहे. एकूण दोन्हीही ग्रामपंचायती धनेगांव, बळीरामपूर या गावाचा परिसर मोठा आहे. सज्जा अंतर्गत शेतीची ७/१२ वर नोंद घेण्यासाठी लिंक रजिस्ट्री दिली. नियमानुसार कागदपत्रे दिले तरी शेतीची ७/१२ वर नोंद घेण्यासाठी, फेर घेण्यासाठी ५० हजार रुपये तलाठी डी. एस. सोनटक्के हे मागणी करीत असल्याची तक्रारही शिंदे यांनी केली आहे. प्लॉटधारक प्लॉटची नोंद ७/१२ वर घेण्यासाठी गेले असता त्यांना साधा प्लॉट ३०X४० चा ७/१२ उताऱ्यावर फेर घेण्यासाठी तलाठी डी. एस. सोनटक्के हे २५ हजार रुपयांची मागणी करीत आहेत. याही पलीकडे वारसा हक्काच्या नोंदीसाठी कुणी जर तलाठी ऑफीसला गेले तर त्यांनाही पैशाची मागणी होत आहे. तलाठी सज्जा धनेगांव येथील तलाठी सोनटक्के ७/१२ नोंद, प्लॉटचा फेरफार, वारसा हक्क या सर्व बाबीसाठी अव्वाच्या सव्वा रुपयाची मागणी करणाऱ्या तलाठ्यांना तात्काळ हटवून नवीन तलाठी देण्याची मागणी केली आहे.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# प्रत्येकासाठी फायदेशीर नाही उपवास!



## थायरॉइडच्या रुग्णांनी कोणती काळजी घ्यावी?

**वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी अनेकजण सर्वप्रथम भूक नियंत्रित करणे किंवा उपवास (फास्टिंग) करण्याचा पर्याय निवडतात. उपवास केल्याने वजन कमी होते, रक्तातील साखर नियंत्रणात राहते आणि चयापचय (मेटाबॉलिझम) सुधारतो, अशी अनेकांची धारणा असते. मात्र, तज्ञांच्या मते हा समज प्रत्येकासाठी योग्य नाही. विशेषतः थायरॉइडचा त्रास असलेल्या व्यक्तींनी कोणताही उपवास सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.**

आजकाल इंटरमिटंट फास्टिंग आणि दीर्घकाळ उपवास करणे हे वजन कमी करण्यासाठी आणि आरोग्य सुधारण्यासाठी लोकप्रिय झाले आहे. अनेकांना वाटते की उपवासामुळे शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात आणि चयापचय सुधारतो. मात्र, याचा थायरॉइड ग्रंथीच्या कार्यावरही परिणाम होऊ शकतो. थायरॉइड ग्रंथी शरीरातील चयापचय, ऊर्जा निर्मिती आणि शरीराचे तापमान नियंत्रित करण्यास मदत करते. उपवासादरम्यान शरीराला पुरेशा कॅलरी मिळाल्या नाहीत, तर थायरॉइड संप्रेरकांच्या (हार्मोन्स) निर्मिती आणि कार्यामध्ये बदल होऊ शकतो. काही संशोधनांनुसार दीर्घकाळ कमी कॅलरी मिळाल्यास टी-३ (T3) संप्रेरकाची पातळी कमी होऊ शकते, ज्यामुळे चयापचयाचा वेग मंदावतो.



## उपवासामुळे थायरॉइडचा आजार होतो का?

उपवासामुळे थेट थायरॉइडचा आजार होत नाही. मात्र, दीर्घकाळ कॅलरीची कमतरता राहिल्यास थायरॉइड संप्रेरकांच्या पातळीवर परिणाम होऊ शकतो. गळ्यातील फुलपाखराच्या आकाराची थायरॉइड ग्रंथी टी-३ (T3) आणि टी-४ (T4) ही संप्रेरके तयार करते. ही संप्रेरके शरीरातील ऊर्जा वापर, चयापचय, शरीराचे तापमान, हृदयाचे ठोके आणि इतर अनेक महत्त्वाच्या कार्यांचे नियमन करतात. संशोधनानुसार शरीराला आवश्यक ऊर्जा किंवा कॅलरी मिळाल्या नाहीत, तर शरीर ऊर्जा साठवून ठेवण्यासाठी चयापचयाचा वेग कमी करण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे टी-३ आणि टी-४ संप्रेरकांची निर्मिती कमी होऊ शकते. याचा अर्थ असा नाही की प्रत्येक व्यक्तीला उपवासामुळे थायरॉइडचा आजार होईल; मात्र आधीपासून थायरॉइडचा त्रास असलेल्या व्यक्तींमध्ये याचा परिणाम अधिक स्पष्टपणे दिसू शकतो.

## थायरॉइडची लक्षणे कशी वाढू शकतात?

- ज्या व्यक्तींना आधीपासून हायपोथायरॉइडिझम आहे, त्यांच्यामध्ये चुकीच्या किंवा अतिप्रमाणातील उपवासामुळे पुढील लक्षणे अधिक तीव्र होऊ शकतात.
- थकवा आणि अशक्तपणा वाढणे : शरीरातील ऊर्जा आधीच कमी असल्याने दीर्घकाळ उपाशी राहिल्यास अधिक थकवा जाणवू शकतो.
- अधिक थंडी वाजणे : थायरॉइड संप्रेरके शरीराचे तापमान नियंत्रित करतात. टी-३ कमी झाल्यास थंडी अधिक जाणवू शकते.
- एकाग्रता कमी होणे : मेंदूला सतत ग्लुकोजची आवश्यकता असते. दीर्घकाळ अन्न न मिळाल्यास लक्ष केंद्रित करण्यात अडचणी येऊ शकतात.
- वजन कमी होण्याचा वेग मंदावणे : वजन कमी करण्यासाठी उपवास केला जात असला, तरी अतिशय कमी कॅलरी घेतल्यास चयापचय मंदावतो आणि वजन घटण्याची प्रक्रिया संथ होऊ शकते.

### इंटरमिटंट फास्टिंग नेहमीच हानिकारक असते का?

याचे उत्तर नाही असे आहे. संशोधनानुसार नियंत्रित पद्धतीने केलेले इंटरमिटंट फास्टिंग लठ्ठपणा, इन्सुलिन रेझिस्टन्स आणि शरीरातील सूज कमी करण्यास मदत करू शकते. संतुलित आहार घेतला जात असेल आणि उपवासाचा कालावधी योग्य असेल, तर अनेकांसाठी तो सुरक्षित ठरू शकतो. मात्र, थायरॉइडच्या रुग्णांसाठी वैयक्तिक वैद्यकीय सल्ला अत्यावश्यक आहे.


### उपवासामुळे थायरॉइड संप्रेरकांवर काय परिणाम?

शरीराला अन्नातून मिळणाऱ्या ऊर्जेनुसार संप्रेरकांमध्ये सतत बदल होत असतात. दीर्घकाळ अन्न मिळाले नाही, तर शरीर 'सर्व्हायव्हल मोड'मध्ये जाते. अशा वेळी टी-३ (T3) संप्रेरकाची पातळी कमी होऊ शकते. रिव्हर्स टी-३ (Reverse T3) वाढू शकतो. शरीर ऊर्जा वाचवण्यासाठी चयापचयाचा वेग कमी करते.

## कोणी विशेष काळजी घ्यावी?

- थायरॉइडची औषधे नियमित घेत असलेले रुग्ण.
- गर्भवती महिला.
- कमी वजन असलेल्या व्यक्ती.
- हाशिमोटो थायरॉइडायटिस (Hashimoto's Thyroiditis) सारख्या ऑटोइम्यून थायरॉइड आजाराने ग्रस्त रुग्ण.
- अशा रुग्णांनी उपवासाचा कालावधी, आहारातील पोषणमूल्ये आणि कॅलरीचे प्रमाण याकडे विशेष लक्ष द्यावे.

उपवासामुळे थेट थायरॉइडचा आजार होत नसला, तरी तो थायरॉइड संप्रेरकांचे कार्य आणि शरीराचा चयापचय प्रभावित करू शकतो. विशेषतः हायपोथायरॉइडिझम किंवा इतर थायरॉइड विकार असलेल्या व्यक्तींमध्ये दीर्घकाळ उपाशी राहिल्यास काही लक्षणे वाढू शकतात. त्यामुळे अशा रुग्णांनी कोणत्याही प्रकारचा उपवास सुरू करण्यापूर्वी डॉक्टर किंवा एंडोक्राइनोलॉजिस्टचा सल्ला घेणे आवश्यक आहे. संतुलित आहार, पुरेशा कॅलरीचे सेवन आणि योग्य वैद्यकीय मार्गदर्शन यामुळे उपवास अधिक सुरक्षित आणि परिणामकारक ठरू शकतो.



# पावसाळ्यात वारंवार सर्दी-खोकला होतोय?

## संसर्गापासून संरक्षणासाठी कडुनिंब ठरू शकतो उपयुक्त; जाणून घ्या त्याचे फायदे

**पावसाळ्यात साचलेले पाणी, वाढलेली आर्द्रता आणि अस्वच्छता यामुळे जीवाणू, विषाणू तसेच बुरशीजन्य संसर्गाचा धोका वाढतो. अशा वेळी शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते. आयुर्वेदानुसार कडुनिंब (नीम) हा संसर्गापासून संरक्षण करण्यास, रक्तशुद्धी करण्यास आणि रोगप्रतिकारक शक्तीला आधार देण्यास उपयुक्त मानला जातो. वैद्यकीय तज्ञांच्या मते, पावसाळ्यात मर्यादित प्रमाणात कडुनिंबाचे सेवन केल्यास शरीराला ऋतू बदलाशी जुळवून घेण्यास मदत होऊ शकते.**





### पावसाळ्यात कडुनिंबाचे महत्त्व

पावसाळ्यात वातावरणातील आर्द्रतेमुळे जीवाणू, विषाणू आणि बुरशी यांची वाढ वेगाने होते. त्याचबरोबर ऋतू बदलामुळे शरीरातील वात, पित्त आणि कफ या दोषांचे संतुलन बिघडू शकते. आयुर्वेदानुसार या काळात पित्तदोष वाढण्याची आणि पचनशक्ती (जठराग्नी) मंदावण्याची शक्यता असते. कडुनिंबाची चव कडू आणि प्रकृती थंड असल्याने आयुर्वेदात त्याला रक्तशुद्धीकारक, पित्त-कफ संतुलित करणारा आणि रोगप्रतिकारक शक्तीला मदत करणारा औषधी वनस्पती म्हणून महत्त्व दिले जाते.

### ऋतू बदलात आयुर्वेद काय सांगतो?

आयुर्वेदानुसार ऋतू बदलाच्या काळात शरीरातील दोषांचे संतुलन ढासळू शकते. पावसाळ्यात विशेषतः पचनशक्ती कमी होते आणि पित्तदोष वाढू शकतो. अशा वेळी कडुनिंबासारख्या कडू औषधी वनस्पतींचे मर्यादित प्रमाणात सेवन शरीराचे संतुलन राखण्यास उपयुक्त ठरते. आयुर्वेदिक ग्रंथांमध्ये कडुनिंबाला रक्तशुद्धीकारक, कृमिनाशक, त्वचेसाठी हितकारक आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास सहाय्यक मानले आहे. मात्र त्याचे सेवन प्रत्येकाच्या प्रकृतीनुसार आणि आरोग्यस्थितीनुसार करणे आवश्यक आहे.

### आधुनिक संशोधन काय सांगते?

आधुनिक संशोधनानुसार कडुनिंबामध्ये निंबिडीन (Nimbidin), अझादिरॅक्टिन (Azadirachtin) आणि निंबिन (Nimbin) यांसारखी जैवसक्रिय (Bioactive) संयुगे आढळतात. या घटकांमध्ये प्रतिजैविक (Antimicrobial) आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. त्यामुळे पावसाळ्यात होणाऱ्या काही संसर्गांपासून शरीराचे संरक्षण करण्यास त्यांची मदत होऊ शकते.



### पावसाळ्यात कडुनिंब सेवनाचे फायदे

- रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत : कडुनिंबातील अँटिऑक्सिडंट आणि जैवसक्रिय घटक शरीराच्या नैसर्गिक रोगप्रतिकारक यंत्रणेला आधार देऊ शकतात. त्यामुळे हंगामी ताप आणि संसर्गांशी लढण्यास मदत मिळू शकते.
- त्वचेच्या समस्या कमी होण्यास मदत : पावसाळ्यात वाढलेल्या आर्द्रतेमुळे मुरूम, खाज, ॲलर्जी आणि इतर त्वचारोग वाढण्याची शक्यता असते. आयुर्वेदानुसार कडुनिंब रक्तशुद्धी करून त्वचेचे आरोग्य सुधारण्यास मदत करतो. त्यामुळे त्वचेच्या समस्यांमध्ये कडुनिंबाच्या पावडरचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो.
- जीवाणू आणि बुरशीजन्य संसर्गाचा धोका कमी करण्यास सहाय्य : दमट वातावरणात बुरशी आणि जीवाणूंची वाढ जलद होते. कडुनिंबातील दाहशामक (Anti-inflammatory) आणि प्रतिजैविक गुणधर्म बुरशीजन्य व जीवाणूजन्य संसर्गाचा धोका कमी करण्यास मदत करू शकतात.
- पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत : पावसाळ्यात दूषित अन्न व पाण्यामुळे पोटाचे विकार वाढू शकतात. आयुर्वेदानुसार कडुनिंबाचे मर्यादित सेवन पचनशक्ती सुधारण्यास तसेच आतड्यांतील कृमींचा धोका कमी करण्यास उपयुक्त मानले जाते.

### कडुनिंबाचे सेवन कसे करावे?

पावसाळ्यात सकाळी रिकाम्या पोटी कडुनिंबाची तीन ते चार कोवळी पाने चावून खाऊ शकता किंवा मर्यादित प्रमाणात त्याचा रस घेऊ शकता. यामुळे हंगामी आजारांपासून संरक्षण मिळण्यास मदत होऊ शकते.

### लक्षात ठेवण्यासारखे...

आयुर्वेदानुसार योग्य आणि मर्यादित प्रमाणात कडुनिंबाचे सेवन केल्यास ऋतू बदलाचा शरीरावर होणारा परिणाम कमी होण्यास मदत होऊ शकते. आधुनिक संशोधनातही त्याच्या अँटिऑक्सिडंट, प्रतिजैविक आणि बुरशीरोधक गुणधर्मांचा उल्लेख आहे. मात्र उपलब्ध वैज्ञानिक पुराव्यांपैकी अनेक प्रयोगशाळा किंवा प्राथमिक संशोधनांवर आधारित आहेत. त्यामुळे कडुनिंबाला कोणत्याही आजारावरील उपचार म्हणून नव्हे, तर संतुलित आहार, स्वच्छता आणि निरोगी जीवनशैलीचा पूरक घटक म्हणूनच वापरावा. गर्भवती महिला, स्तनपान करणाऱ्या माता, लहान मुले किंवा दीर्घकालीन आजारांवरील औषधे घेत असलेल्या व्यक्तींनी कडुनिंबाचे नियमित सेवन सुरू करण्यापूर्वी वैद्यकीय किंवा आयुर्वेद तज्ञांचा सल्ला घ्यावा.

# जिमशिवाय पोटावरील चरबी कशी कमी कराल?

## फिटनेस प्रशिक्षकांनी सांगितले 5 प्रभावी व्यायाम



**जिममध्ये न जाता वजन कमी करायचे आहे किंवा वाढलेले पोट आत घ्यायचे आहे, तर त्यासाठी केवळ व्यायाम नव्हे, तर योग्य आहार, नियंत्रित कॅलरी सेवन आणि पुरेशी विश्रांतीही तितकीच महत्त्वाची आहे. फिटनेस तज्ञांच्या मते, पोटावरील चरबी कमी करण्यासाठी योग्य प्रकारचा व्यायाम, संतुलित पोषण आणि सातत्य यांचा समन्वय आवश्यक आहे. घरच्या घरी करता येणारे काही सोपे व्यायाम नियमित केल्यास शरीराची चरबी जाळण्याची क्षमता वाढते आणि पोटावरील अतिरिक्त चरबी कमी होण्यास मदत मिळते.**

पोटावरील चरबी कमी करण्यासाठी कमी तीव्रतेचा पण सातत्यपूर्ण एरोबिक व्यायाम अत्यंत प्रभावी मानला जातो. यासाठी आठवड्यातून चार ते पाच दिवस ३० ते ६० मिनिटे वेगाने चालणे, सायकलिंग किंवा एकाच गतीने जॉगिंग करावे. व्यायाम करताना शरीरावर अनावश्यक ताण न देता स्थिर गती राखणे महत्त्वाचे आहे. नियंत्रित कॅलरीयुक्त आहारासोबत हा व्यायाम केल्यास संपूर्ण शरीरातील चरबी कमी होण्यास मदत होते. याशिवाय, स्क्वॅट्स, पुश-अप्स आणि चिन-अप्स यांसारखे स्ट्रेंथ ट्रेनिंगचे व्यायामही उपयुक्त ठरतात. हे संमिश्र (कंपाउंड) व्यायाम असल्यामुळे शरीरातील अनेक स्नायू एकाच वेळी कार्यरत होतात आणि अधिक कॅलरी खर्च होतात. आठवड्यातून दोन ते तीन वेळा असे व्यायाम करून त्यांची तीव्रता हळूहळू वाढविल्यास शरीर अधिक सक्षम बनते आणि चरबी कमी होण्यास मदत मिळते.

कॅलिस्थेनिक्स हा संपूर्ण शरीरासाठी उपयुक्त व्यायामप्रकार असून त्यामध्ये बर्पीज, माउंटन क्लायम्बर्स, पुश-अप्स आणि जंप स्क्वॅट्स यांचा समावेश होतो. या व्यायामांमुळे ताकद वाढण्याबरोबरच मोठ्या प्रमाणात कॅलरी खर्च होतात. मात्र, अपेक्षित परिणाम दिसण्यासाठी हे व्यायाम काही आठवडे सातत्याने आणि नियंत्रित कॅलरीयुक्त आहारासोबत करणे आवश्यक आहे.

कमी वेळेत अधिक कॅलरी खर्च करण्यासाठी हाय-इंटेन्सिटी इंटरव्हल ट्रेनिंग हा प्रभावी पर्याय आहे. यामध्ये ३० सेकंद अतिवेगाने धावणे आणि त्यानंतर ३० सेकंद हलके जॉगिंग करणे, अशी प्रक्रिया २० ते ३० मिनिटे पुनरावृत्ती करावी. या प्रकारच्या व्यायामामुळे हृदयाचे ठोके आणि शरीराचा चयापचय वेगवान होतो. त्यामुळे व्यायाम संपल्यानंतरही शरीर काही काळ अतिरिक्त कॅलरी खर्च करत राहते. जंप स्क्वॅट्स, बर्पीज आणि हाय नीज यांसारखे व्यायाम यात समाविष्ट केल्यास त्याचा अधिक फायदा होऊ शकतो.

पोटाच्या स्नायूंना मजबूत करण्यासाठी प्लँक हा अत्यंत प्रभावी व्यायाम मानला जातो. फोरआर्म प्लँक आणि साइड प्लँक हे प्रकार नियमित केल्याने पोटाचे स्नायू मजबूत होतात आणि शरीर अधिक टोन दिसू लागते. प्रत्येक प्रकाराचे दोन ते तीन सेट करून प्लँक धरण्याचा कालावधी हळूहळू वाढवत नेणे योग्य ठरते.

फिटनेस तज्ञांच्या मते, व्यायामाइतकेच संतुलित आहार, पुरेसे पाणी, सात ते आठ तासांची झोप आणि प्रथिनयुक्त आहार यांनाही महत्त्व आहे. वजन कमी करण्यासाठी 'कॅलरी डेफिसिट' राखणे आवश्यक असते. म्हणजे शरीर जितक्या कॅलरी खर्च करते, त्यापेक्षा कमी कॅलरी आहारातून घेणे. निरोगी पद्धतीने वजन कमी करण्यासाठी दररोज सुमारे ५५० ते १,१०० कॅलरींचे डेफिसिट ठेवता येते. त्यामुळे आठवड्याला साधारण अर्धा ते एक किलो वजन कमी होऊ शकते. मात्र, अतिप्रमाणात कॅलरी कमी केल्यास पोषणतत्त्वांची कमतरता, स्नायूंचे नुकसान, सतत थकवा आणि चयापचयाचा वेग मंदावण्याचा धोका असतो.

म्हणूनच वजन कमी करण्यासाठी केवळ व्यायामावर अवलंबून न राहता संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि सातत्य या चार गोष्टींचा समतोल राखणे गरजेचे आहे. कोणतीही नवीन व्यायामपद्धती सुरू करण्यापूर्वी फिटनेस प्रशिक्षक किंवा वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणेही आवश्यक आहे, कारण प्रत्येक व्यायाम सर्वांसाठी सुरक्षित असेलच असे नाही. तसेच पोटावरील चरबी एका विशिष्ट भागातून कमी करता येत नाही. नियमित व्यायाम आणि योग्य जीवनशैलीमुळे संपूर्ण शरीरातील चरबी कमी होत जाते आणि त्याचबरोबर पोटावरील अतिरिक्त चरबीही हळूहळू कमी होऊ लागते.

# पॅरिसच्या धर्तीवर वाढवण बंदराजवळ उभारणार आंतरराष्ट्रीय कृषी बाजार



## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; राज्यातील शेतमाल निर्यातीला चालना मिळणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – पालघर जिल्ह्यात विकसित होत असलेल्या 'वाढवण बंदरा'ला जोडून दापचरी येथे जागतिक दर्जाचा आंतरराष्ट्रीय कृषी बाजार (इंटरनॅशनल टर्मिनल मार्केट) उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी मंत्रालयात पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रकल्पासाठी पशुसंवर्धन विभागाच्या दापचरी दुग्ध प्रकल्पाची ५५८.४३ हेक्टर जमीन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळास विनामूल्य वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली. फ्रान्समधील पॅरिसनजीक असलेल्या जगातील सर्वात मोठ्या 'रुंगिस' घाऊक बाजारपेठेच्या धर्तीवर हा बाजार विकसित केला जाणार असून, यामुळे कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि नाशिक विभागातील शेतमाल व सागरी उत्पादनांच्या आंतरराष्ट्रीय निर्यातीला अभूतपूर्व गती मिळणार आहे.

पॅरिसजवळील २३४ हेक्टरवर पसरलेला 'रुंगिस' बाजार हा दरवर्षी २९ लाख टनांपेक्षा जास्त अन्नपदार्थांची हाताळणी करतो. याच जागतिक मानकांनुसार दापचरी येथील ५५८ हेक्टरहून अधिक विस्तीर्ण जागेवर 'फेज-१' अंतर्गत टर्मिनल मार्केट, कोल्ड चेन (शीतगृहे) आणि अद्ययावत 'निर्यात पॅकहाऊस' उभारले जाईल. या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत एकात्मिक लिलाव प्लॅटफॉर्मसह 'ई-नाम' प्रणाली, मालाची प्रतवारी व पॅकेजिंग सुविधा, शीतगृहे, पिकवण्याच्या खोल्या आणि गोदामे असतील. आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आवश्यक असणारी सीमाशुल्क मंजुरी, वनस्पती विलगीकरण आणि थेट कंटेनर बेज यांसारख्या कस्टम-शेड सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जातील. याशिवाय शेतकऱ्यांसाठी वसतिगृहे, प्रशिक्षण केंद्रे आणि संपूर्ण परिसरासाठी सौर ऊर्जा, जल पुनर्वापर आणि कचरा व्यवस्थापनाची पर्यावरणपूरक प्रणाली विकसित केली जाणार आहे.

हा कृषी बाजार भौगोलिकदृष्ट्या अत्यंत मोक्याच्या ठिकाणी आहे. राष्ट्रीय महामार्ग-४८ जवळ असलेल्या या बाजारापासून वाढवण बंदर अवघ्या ४० किमी अंतरावर आहे. तसेच मुंबई विमानतळ १२८ किमी, तर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ १४९ किमी अंतरावर आहे. रेल्वे आणि रस्त्यांच्या जाळ्यामुळे हा बाजार महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि कर्नाटकशी थेट जोडला जाईल. या प्रकल्पामुळे पालघरमधील चिकू, आंबा, भात, सिमला मिरची यांसह नाशिक व ठाणे जिल्ह्यातील फळे आणि भाजीपाल्याला थेट बाजारपेठ मिळेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कोकणातील मच्छिमार समुदाय आणि सागरी खाद्य प्रक्रिया उद्योगाला याद्वारे थेट जागतिक खरेदीदार व निर्यातदार मिळतील. आधुनिक साखळीमुळे काढणीनंतर होणारे शेतमालाचे १५ ते ३० टक्के नुकसान टळणार असून, स्थानिक भागात ८ हजार ते १५ हजारांहून हून अधिक थेट रोजगार निर्माण होतील. यात स्थानिक आदिवासी महिला आणि युवकांना कौशल्य विकासाद्वारे प्राधान्य दिले जाईल.

# नाविन्यपूर्ण उपक्रमांतून जादूटोणा विरोधीकायद्याची प्रभावी जनजागृती करा -विभागीय आयुक्त जी. श्रीकांत



**छत्रपती संभाजीनगर(वृत्तसंस्था)**– अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागातील सर्व जिल्ह्यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून व्यापक जनजागृती करावी. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी समाजातील सर्व घटकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यावर भर द्यावा, अशा सूचना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.

जादूटोणा प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीसाठी गठित विभागीय समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस विभागातील जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, समाज कल्याण, तसेच संबंधित विभागांचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्रीकांत यांनी जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल प्रकरणे, जनजागृती उपक्रम आणि उपलब्ध निधीच्या वापराचा विभागनिहाय आढावा घेत जिल्हास्तरीय समित्यांच्या बैठका नियमित घेऊन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्याच्या अंमलबजावणीचाही आढावा घेण्यात आला. दाखल प्रकरणांचा वेळेत निपटारा, पीडितांना तातडीने आर्थिक मदत, पुनर्वसन आणि शासनाच्या सवलतींचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

तसेच तृतीयपंथीय हक्क संरक्षण व कल्याण मंडळाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तृतीयपंथीय व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळावा, त्यांच्या समस्या संवेदनशीलतेने सोडवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, अशाही सूचना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.

बैठकीत विभागातील पोलीस ठाण्यांमध्ये कार्यान्वित सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा तसेच विविध कारणांमुळे बंद असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या स्थितीचाही आढावा घेण्यात आला.

बंद कॅमेरे तातडीने दुरुस्त करून कार्यान्वित करावेत, तसेच पोलीस ठाण्यांमध्ये प्रस्तावित सीसीटीव्ही यंत्रणेची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.

यावेळी विभागातील संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# लातूर विभागाच्या उपसंचालक (माहिती) पदाचा सुनिल कच्छवे यांनी स्वीकारला पदभार



**लातूर (प्रतिनिधी)**– शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लातूर विभागाच्या उपसंचालक (माहिती) पदाचा पदभार विभागीय माहिती कार्यालय, लातूर येथे सुनिल कच्छवे यांनी आज स्वीकारला.

पदभार स्वीकारुन त्यांनी विभागीय माहिती कार्यालय, आणि लातूर जिल्हा माहिती कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेतला. विभागाच्यावतीने सहायक संचालक (माहिती) डॉ. श्याम टरके यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी लातूरचे प्र.जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, सहायक अधीक्षक अशोक माळगे, वरिष्ठ लिपिक मनिषा कुरूलकर, कनिष्ठ लिपिक कैलास लांडगे, शिपाई अशोक बोर्डे, शेख कलीम आदी उपस्थित होते.

सामान्य प्रशासन विभागाने ०८ जुलै २०२६ रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील उपसंचालक (माहिती), गट अ (वरिष्ठ) पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीने त्यांची सरळसेवेने नियुक्ती केली आहे.

## पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी -परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

# एसटीच्या ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ

**मुंबई(प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्या विहार येथील विभागीय कार्यालयातून राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी आमदार दिलीप लांडे, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह महामंडळाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या अभियानाच्या माध्यमातून राज्यभरातील एसटीची बसस्थानके, आगारे, कार्यालये आणि विविध परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, आजचा कार्यक्रम हा केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित नसून भावी पिढ्यांसाठी हिरवा, समृद्ध आणि सुरक्षित महाराष्ट्र घडविण्याचा सामूहिक संकल्प आहे. वाढते जागतिक तापमान, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, दुष्काळ, पूर आणि उष्णतेच्या लाटांसारख्या पर्यावरणीय संकटांचा सामना करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

झाडे ही पृथ्वीची फुफ्फुसे असून ती प्राणवायू पुरवतात, कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, तापमान नियंत्रित ठेवतात आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे एक झाड लावणे म्हणजे भविष्यातील अनेक संकटांवर उपाय उभा करणे होय, असेही त्यांनी सांगितले.

एसटी महामंडळ हे केवळ प्रवाशांना सेवा देणारे परिवहन माध्यम नसून समाजाशी नाळ जोडलेली सामाजिक संस्था आहे. त्यामुळे समाजहिताचे आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविणे ही देखील एसटीची सामाजिक बांधिलकी असल्याचे मंत्रभ सरनाईक यांनी नमूद केले.

वृक्षारोपण करून जबाबदारी संपत नाही, तर प्रत्येक रोप जगविणे, त्याचे संगोपन करणे आणि संरक्षण करणे हे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी एक कर्मचारी एक वृक्ष आणि एक नागरिक एक वृक्ष हा संकल्प प्रत्येकाने स्वीकारावा असे आवाहन केले. एसटीच्या प्रत्येक आगारात, बसस्थानकात आणि कार्यालय परिसरात हिरवाई निर्माण करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी आणि प्रवाशांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही परिवहन मंत्री सरनाईक यांनी केले.

७८ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करताना, निसर्गाचे संरक्षण म्हणजे मानवजातीचे संरक्षण असल्याचे अधोरेखित करून हरित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.


## टी. सी. हरवली

माझी अशमिरा साजिद सय्यद या नावाची दहावी पासची टी. सी. सिडको ते लातूर फाटा ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.
मो. नं. ७३५०३६९८४२

## टी. सी. हरवली

माझी कु. विद्यासागर माधव लोकरे या नावाची इयत्ता सातवी पासची टी. सी. सरसम ते नांदेड दरम्यान प्रवासात हरवली आहे. तरी कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती. **संपर्क पत्ता** – कु. विद्यासागर माधव लोकरे रा. साईप्रसादनगर नांदेड ता. वसमत, जि. हिंगोली मो. ९८२२४६६०७२

## टी. सी. हरवली

माझी अर्चना विठ्ठराव पौळ या नावाची इयत्ता दहावी नापासची टी. सी. बाळापूर ते हदगाव दरम्यान प्रवासात हरवली आहे. तरी कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती. **संपर्क पत्ता** – अर्चना विठ्ठलराव पौळ, रा. सिरळी ता. वसमत, जि. हिंगोली मो. ९८२२४६६०७२

## Change In Name

My Old Name is MOHAMMED SHAKEF ADNAN which now I am changing as New Name MOHAMMAD SHAKEF ADNAN Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - H. No.9-6-148 Nandigam Society Umar Colony Near Degloor Naka, Nanded M.S.-431604 Mo. 9623009770

## Change In Name

My old Name is: SYEDAKBAR SYEDSALIM which now am changing as new name SYED AKBAR SYED SALEEM Fenceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same. Address: SYED SALEEM H.No. 8-4-399 Sidhnath Puri, Choupala Water Tank, Near Sai Kirana, itwara, Dist. Nanded 431604, Mobile No: +919822378958

## Change In Name

My Old Name is KAUSAR BEGUM which now I am changing as New Name KAUSAR FATEMA SHAIKH SAMEER Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - H. No.1-2-231/4 Near, Syed Kirana Dukan Tehra Nagar Nanded-431602
Mo. 9766775518

## टी. सी. हरवली

माझी शेख शहनाज शादुल या नावाची इयत्ता १२ वी पास ची टि सी तळणी ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा. **संपर्क-शेख शहनाज शादुल** रा. तळणी, ता. बिलोली, जि. नांदेड

## टी. सी. हरवली

माझी प्रेम धोंडीबा पवार या नावाची दहावी पासची टीसी व कागदपत्रे अर्धापूर ते नांदेड एसटीने प्रवास करताना हरवली आहे कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता- प्रेम धोंडीबा पवार रा. शहापूर तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड मो. नं. ९३०९८१६६१६

## Change In Name

My Old Name is S. ARJUN SINGH MUNIM which now I am changing as New Name ARJAN SINGH MUNIM Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - GURUDWARA Gate No No. 4, BADPURA Nanded
Mo. No. 9604952608

**बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११७/२०२६ पुढील तारीख-२०/७/२०२६**

अर्जदार-१. पार्वतीबाई भ्र. विरभद्र बोडके वय - ६८ वर्षे, व्यवसाय शेती, रा. पोखर्णी, बिलोली ता. बिलोली जि.नांदेड. २. राजकुमार पि. विरभद्र बोडके, वय - ३७ व्यवसाय शेती, रा. पोखर्णी बिलोली ता. बिलोली जि.नांदेड. ३.हाउताई विरभद्र बोडके, वय २६ वर्षे, व्यवसाय- शेती, रा. पोखर्णी बिलोली ता. बिलोली जि. नांदेड, ४. आरती भ्र नागभूषण शेटपेल्ली, वय - ३५ वर्षे, व्यवसाय शेती, रा. टाकळी, मंडळ टाकळी, जि. आदिलाबाद, ५.नागमणी विरभद्र बोडके, वय - ३९ व्यवसाय - रा. पोखर्णी बिलोली ता. बिलोली जि.नांदेड. शेती, - ६. अनन्या भ्र.राहुल पाटील, वय - ३० वर्षे, व्यवसाय शेती, रा. मचनुर ता. बिलोली जि. नांदेड, ७. शोभाताई विरभद्र बोडके, वय - ३१ वर्षे, व्यवसाय शेती रा. पोखर्णी बिलोली ता. बिलोली जि.नांदेड.

विरुध्द.

शाखा अधिकारी-एन.डी.सी.सी. बँक, शाखा बिलोली, ता. बिलोली जि. नांदेड

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत विरभद्र गंगाराम बोडके यांचे अर्जदार क्र ०१ ही विधवा पत्नी तसेच अर्जदार क्रमांक ०२ ते ०७ हे यांच्या मुली व मुले आहेत. मयत विरभद्र गंगाराम बोडके यांचा मृत्यु दिनांक ०७.०५.२०२६ रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, मयत विरभद्र गंगाराम बोडके यांचे गैरअर्जदार यांच्या शाखेत खालील तक्ता मध्ये दर्शविलेले खाते क्रमांक मध्ये रक्कम जमा आहे.

अनु. क्र. १)-बँक नाव व शाखा, एन.डी.सी.सी. बँक, शाखा बिलोली ता. बिलोली जि.नांदेड खाते क्र. ११४१११००२००२७६२, जमा रक्कम-६,८८,५८९. त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १२/०५/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

**भगवान श्री. चक्रधर स्वामी ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या., नांदेड ता. जि. नांदेड**

**सभासदांकरीता सभेची नोटीस**

नियोजीत भगवान श्री. चक्रधर स्वामी ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या., नांदेड ता. जि. नांदेड या संस्थेची नोंदणी दिनांक १३ जुलै, २०२६ रोजी झाली असुन नोंदणी क्रमांक एनएनडी/आरएसआर/औ/८३३/२०२६ असा आहे. सदर संस्थेची नोंदणी नंतरची पहिली सर्वसाधारण सभा दिनांक २२ जुलै, २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थेचे कार्यालय भगवान श्री. चक्रधर स्वामी ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या., नांदेड स्थळ :- पहीला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती, च्या बाजुला नवा मोंढा, नांदेड येथे संस्थेचे प्राधिकृत अधिकारी यांचे अध्यक्षेखाली आयोजित करण्यात आली आहे.

तरी सदर सभेस संस्थेचे सर्व सभासदांनी उपस्थित राहावे. ही विनंती.

**(आनंदराव पंजाबराव मुंगल)**
**मुख्यप्रवर्तक,**
**भगवान श्री. चक्रधर स्वामी ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या.. नांदेड ता. जि. नांदेड**

## Change In Name

My Old Name is MOHAMMED AKEF IMRAN which now I am changing as New Name MOHAMMAD AAKEF IMRAN RAFE SHAFI Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - H. No.9-6-148 Nandigam Society Umar Colony Near Degloor Naka, Nanded M.S.-431604 Mo. 9623009770

## Change In Name

My Old Name is MOHAMMED ASIM IRFAN which now I am changing as New Name MOHAMMAD AASIM IRFAN ABDUL RAFE SHAFI Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - H. No.9-6-148 Nandigam Society Umar Colony Near Degloor Naka, Nanded M.S.-431604 Mo. 9623009770

## Change In Name

My Old Name is HARPREET SINGH S. ARJUN SINGH MUNIM which now I am changing as New Name HARPREET SINGH ARJAN SINGH MUNIM Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - GURUDWARA Gate No No. 4, BADPURA Nanded
Mo. No. 9604952608

## Change In Name

My Old Name is BHASKAR DAWANE which now I am changing as New Name BHASKAR SADASHIV DAWANE Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - R/o H. No. 1-19-486, SRAVASTI NIWAS KISHOR NAGAR Nanded-431604


## Change In Name

My Old Name is ABDUL WASEEM which now I am changing as New Name ABDUL WASEEM ABDUL KHALIL Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - 16762, Prabhat Nagar, Nizam Colony, Popular Kirana Nanded-431605
Mo. No. 7499886377

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## साहित्यिक, शिक्षक सत्त्वहीन होत चाललेत, ही धोक्याची घंटा

### प्रसाद बन वाङ्‌मय पुरस्कार वितरण सोहळ्यात गिरीश कुबेर यांचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** साहित्यिक वास्तवापासून तुटत चालले आहेत. व्यवस्थेची शाबासकी मिळवणे हे त्यांचे उद्दिष्ट झाले आहे. त्यासाठी वाट्टेल ते करण्यात त्यांना किंचितही संकोच वाटत नाही. साहित्यिक आणि शिक्षक हे घटक सत्त्वहीन होतात, तेव्हा तो समाज ऱ्हासाकडे वाटचाल करू लागतो, असे परखड मत लोकसत्ता दैनिकाचे संपादक गिरीश कुबेर यांनी प्रसाद बन वाङ्मय पुरस्कार वितरण सोहळ्यात नांदेड येथे व्यक्त केले.

आरंभी प्रसाद बन महाराज होटाळेकर आणि मातुश्री पद्मिनीबाई बन यांच्या प्रतिमांचे पूजन आणि दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्वागतपर प्रास्ताविक भाषणात प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अच्युत बन यांनी प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वाटचालीचा आढावा घेतला.

प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानतर्फे साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठ साहित्यिक आणि उत्कृष्ट कलाकृतींना दरवर्षी वाङ्‌मय पुरस्कार दिले जातात. यावर्षीचा 'मातुश्री पद्मीनीबाई बन साधना सन्मान' गिरीश कुबेर यांना प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अच्युत बन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. 'प्रसाद बन वाङ्‌मय पुरस्कार' कवी अजीम नवाज राही यांना, 'प्रसाद बन ग्रंथगौरव राज्यस्तरीय पुरस्कार' वसई येथील लेखिका संगीता अरबुने यांना, तसेच स्थानिक पुरस्कार डॉ. प्र. दि. जोशी पाटोदेकर यांना प्रदान करण्यात आला. या तीन पुरस्कारांचे वितरण गिरीश कुबेर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी विचारपीठावर पुरस्कार समितीचे निमंत्रक डॉ. सुरेश सावंत, पत्रकार संजीव कुळकर्णी आणि आमदार अमर राजूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. संजीव कुळकर्णी यांनी चित्रफीत दाखवत गिरीश कुबेर यांचा परिचय करून दिला.

गिरीश कुबेर यांनी मराठी साहित्य, आंतरराष्ट्रीय स्तरावरील वास्तव आणि त्यात भारताचे स्थान या व्यापक विषयावर नेमकेपणाने बोट ठेवले. आपल्या भाषणात त्यांनी मराठी जगतातील साहित्यिक व शिक्षकांचा घसरत चाललेला स्तर याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. व्यवस्थेपुढे न झुकता व्यवस्थेला आव्हान देणाऱ्या साहित्यिकांची मोठी परंपरा असलेल्या महाराष्ट्रातील आजचे साहित्यिक किरकोळ फायद्यासाठी व्यवस्थेपुढे लाळघोटेपणा करतात, ही धोक्याची घंटा असल्याचा इशारा त्यांनी दिला.

आधीचे वक्ते साखरखेर्डा (जि. बुलडाणा) येथील पुरस्कारप्राप्त कवी अजीम नवाज राही यांच्या भाषणातील संदर्भ पकडत कुबेर म्हणाले, की १९९२ पर्यंत 'दहशतवाद' हा शब्द जगाला माहीत नव्हता. दहशतवादाची संकल्पना जागतिक अर्थकारणातून आली असून, आपल्या फायद्यासाठी महासत्तांनी काही नाराज व्यक्तींचे समूह तयार केले आणि ते पोसले. पुढे त्यांचे चोचले पुरवणे हाताबाहेर गेल्याने त्यांना वाऱ्यावर सोडून देण्यात आले. त्यामुळे ते नाराजांचे समूह पोषणकर्त्यांवरच उलटले. त्याला जागतिक कथित समाजाने



'दहशतवाद' हे नाव दिले.

विकसित भारताचे स्वप्न आपल्याला दाखवले जात आहे. पाच ट्रीलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे गाजर दाखवले जात आहे ; परंतु त्यावेळी जगाच्या पसाऱ्यात आपल्या देशाचे स्थान काय, हे लपवले जाते. हे गुपित उघड करण्याचे काम साहित्यिकांनी केले पाहिजे ; परंतु ते आज व्यवस्थेचे गुलाम झाल्यासारखे लिहिताना दिसतात. यावेळी त्यांनी अमेरिकी बुद्धिवादी नोआम चोम्स्की यांचे उदाहरण दिले. व्यवस्थेचे ते कठोर टीकाकार म्हणून ओळखले जातात. पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. पाटोदेकर, संगीता अरबुने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कवी अजीम नवाज राही यांनी आपल्या भावना व्यक्त करताना कुबेरांचे आभार मानले. त्यांच्या 'अयुद्धधर्म' या पुस्तकाचा शेवट आपल्यावरील प्रसंगाने केल्याचे नमूद करताना त्यांच्या भावना उचंबळून आल्या होत्या. राही यांनी मुस्लिमांच्या अस्वस्थ भावनेला उद्‌गार दिला.

संगीता अरबुने यांनी आपल्या लेखनाची निर्मिती प्रक्रिया सांगितली. डॉ. प्र. दि. जोशी पाटोदेकर यांनी शासनाने स्वयंसेवी संस्थांना विश्वासात घेऊन शासकीय कामे करण्याची संधी द्यावी, असे मत मांडले.

रौप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मागील २५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेणारा ग्रंथ 'प्रसादपर्व' आणि डॉ. अच्युत बन लिखित 'ज्वालामुखींच्या प्रदेशात' ह्या दोन पुस्तकांचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरेश सावंत यांनी केले. प्रतिष्ठानच्या सचिव डॉ. वर्षा बन यांनी उपस्थितांचे आभार मानले. या सोहळ्याला साहित्यिक आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अवघ्या १९ महिन्यांत २३६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या; नांदेड जिल्ह्यातील परिस्थिती गंभीर

**नांदेड (मनोहर कदम)–** कृषीप्रधान देशात शेतकरी आजही आर्थिक संकटाच्या गर्तेत सापडला असून, नापिकी, कर्जबाजारीपणा आणि अपुऱ्या उत्पन्नामुळे आत्महत्यांचे सत्र थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. नांदेड जिल्ह्यात जानेवारी २०२५ ते जुलै २०२६ या अवघ्या १९ महिन्यांच्या कालावधीत तब्बल २३६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या प्रकरणांपैकी १९४ आत्महत्या शासनाने मदतीसाठी पात्र ठरवल्या असून, संबंधित कुटुंबांना प्रत्येकी एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. तर १२ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली असून, ३० प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत.

सन २०२५ मध्ये एकूण १७० शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली. त्यापैकी १५९ प्रकरणे पात्र, तर ११ प्रकरणे अपात्र ठरली. जानेवारी ते डिसेंबर २०२५ दरम्यान महिनानिहाय आत्महत्यांची संख्या अनुक्रमे १०, १२, १५, १८, १०, ९, १४, १६, १७, २४, १० आणि १५ अशी होती.

तर २०२६ मध्ये जुलै महिन्यापर्यंत ६६ शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत. जानेवारीमध्ये ११, फेब्रुवारीत ८, मार्चमध्ये ८, एप्रिलमध्ये ८, मेमध्ये १२, जूनमध्ये १३ आणि जुलैमध्ये आतापर्यंत ५ शेतकऱ्यांनी जीवन संपविले आहे.

शासनाच्या निकषांनुसार आर्थिक मदतीसाठी मृत व्यक्ती शेतकरी अथवा शेतीशी संबंधित असणे आवश्यक आहे. तसेच कर्जबाजारीपणा, पिकांचे नुकसान, सिंचनाचा अभाव, अपुरे उत्पन्न किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटासारखी कारणे आत्महत्येशी संबंधित असल्याचे स्पष्ट होणे गरजेचे असते. शेतकरी आत्महत्यांची छाननी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यीय जिल्हास्तरीय समिती, तर उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली १४ सदस्यीय तालुकास्तरीय समित्या कार्यरत आहेत. तरीही जिल्ह्यात सातत्याने वाढणाऱ्या आत्महत्यांची संख्या चिंताजनक असून, शेतकऱ्यांना आर्थिक, तांत्रिक आणि मानसिक आधार देण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## मराठवाड्यात विकासाची मोठी सुप्त शक्ती आहे –ज्येष्ठ विचारवंत माधव भंडारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** डॉ. शंकरराव चव्हाण यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी दिलेल्या योगदानामुळे हा प्रदेश भीषण परिस्थितीतून वाचला. सिंचनाशिवाय मराठवाड्यातील शेतीचा विकास शक्य नव्हता, हे त्यांनी जाणले होते. त्यांच्याच संकल्पनेतून जायकवाडी आणि विष्णुपुरीसारखे प्रकल्प पूर्ण झाले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत तथा सिंचन प्रकल्पग्रस्त पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी उपाध्यक्ष, कॅबिनेट मंत्री दर्जा प्राप्त माधव भंडारी यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील 'डॉ. शंकरराव चव्हाण अध्ययन केंद्रा'च्या वतीने डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित



'मराठवाडा : काल, आज व उद्या'या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण, डॉ. प्रशांत पेशकार आणि नारायण चौधरी उपस्थित होते.

आपल्या व्याख्यानात भंडारी यांनी सांगितले की, मराठवाड्याकडे सुपीक जमीन, उपलब्ध जलसंपदा, कुशल मनुष्यबळ, समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि पर्यटनाची मोठी क्षमता आहे. कृषी, कृषी प्रक्रिया उद्योग, आधुनिक तंत्रज्ञान आणि वारसा पर्यटन यांची प्रभावी सांगड घातल्यास मराठवाडा हा महाराष्ट्राच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' ठरू शकतो.

मराठवाड्याचा इतिहास हजारो वर्षांपूर्वीचा आहे. तेर आणि भोगवर्धन ही प्राचीन व्यापारी केंद्रे ग्रीस व रोमपर्यंत व्यापार करत होती. कापूस, वस्त्रनिर्मिती, काचेच्या वस्तू, मणी, रंगद्रव्ये आणि कृषी प्रक्रिया उत्पादनांच्या निर्यातीचे पुरातत्त्वीय पुरावे येथे आहेत, असे त्यांनी सांगितले. बारवांसारख्या पारंपरिक जलव्यवस्थापन पद्धतींचा उल्लेख करत त्यांनी जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित केले. कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. दिलीप चव्हाण यांनी सूत्रसंचालन व आभार मानले. यावेळी विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे उमरी तालुक्यात कवळे गुरुजींना दिलासा

### महाटी आणि कौडगाव सोसायटीचे ठराव वैध

**उमरी (प्रतिनिधी)–** उमरी तालुक्यातील महाटी व कौडगाव सोसायटीचे ठराव सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे वैध ठरविण्यात आल्यामुळे कवळे गुरुजींचे पार जड झाले आहे.

उमरी तालुक्यातील सेवा सहकारी संस्था महाटी आणि कौडगाव येथील संचालक किशनराव केरबा जाधव आणि अशोक सूर्यवंशी यांच्या विरोधात अनुक्रमे सोपानराव नागोराव मोरे आणि श्रीमती सुमनबाई बाबुराव कदम यांनी विभागीय सहनिबंधक (सहकारी संस्था, लातूर) यांच्याकडे आक्षेप दाखल केला होता. लातूर सहनिबंधकांनी हा आक्षेप फेटाळल्यानंतर, संबंधितांनी छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते.

उच्च न्यायालयाने हे अपील मंजूर केल्यानंतर किशनराव जाधव (महाटी) आणि अशोक सूर्यवंशी (कौडगाव) यांनी सर्वोच्च न्यायालयात (सुप्रीम कोर्ट) धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी करताना दोन्ही संचालकांच्या बाजूने निर्णय देत त्यांच्याविषयी घेण्यात आलेले ठराव 'वैध' ठरवले आहेत. या कायदेशीर लढाईतील विजयामुळे ज्येष्ठ उद्योजक मारोतराव कवळे गुरुजींचे उमरी तालुक्यात राजकीय पारडे जड झाले आहे.

इतर आक्षेपही सर्वोच्च न्यायालयात फेटाळले. दुसऱ्या एका प्रकरणात सेवा सहकारी सोसायटी लि. सिंधी (ता. उमरी) येथील मारोतराव कवळे गुरुजींच्या विरोधात संतोष बाबुराव कवळे यांनी तर सालेगाव (ता. धर्माबाद) सेवा सहकारी संस्थेतून सौ. सागरबाई मारोतराव कवळे यांच्या विरोधात पंडितराव नरवाडे यांनी विभागीय सहनिबंधक लातूर यांच्याकडे आक्षेप घेतला होता. तो आक्षेप लातूर येथे फेटाळल्यानंतर विरोधकांनी उच्च न्यायालय व त्यानंतर सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घेतली. मात्र, सर्वोच्च न्यायालयातही विरोधकांचा निभाव लागला नाही आणि कवळे गुरुजींच्या बाजूने निकाल लागला.

कवळे गुरुजी गटात उत्साहाचे वातावरण विभागीय सहनिबंधक लातूर ते सर्वोच्च न्यायालय दिल्लीपर्यंतच्या कायदेशीर प्रवासात गोरठेकर गटाला यश न आल्यामुळे कवळे गुरुजी गटात कमालीचा आनंद व उत्साहाचे वातावरण आहे. आगामी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (डीसीसी बँक) निवडणुकीसाठी उमरी तालुक्यातून मारोतराव कवळे गुरुजी, तर धर्माबाद तालुक्यातून त्यांच्या पत्नी सौ. सागरबाई मारोतराव कवळे निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे या निकालाला अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

## वांगी शिवारातील जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड; पाच लाखांचा ऐवज जप्त



**नांदेड (प्रतिनिधी) –**तालुक्यातील वांगी शिवारात सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर सोमवार, दि. १३ जुलै रोजी नांदेड ग्रामीण पोलिसांनी धाड टाकून आठ जणांना अटक केली. त्यांच्याकडून ५ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलिसांनी अवैध धंद्यांविरुद्ध कारवाईचे सत्र सुरु केले आहे. वांगी शिवारात जुगाराचा अड्डा सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी सोमवारी सदरील जुगार अड्ड्यावर धाड टाकली. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असताना अशपाख अब्दुल रज्जाक कुरेशी, रियाज अब्दुल रहेमान कुरेशी, अब्दुल रहेमान अब्दुल जब्बार कुरेशी रा.चौफाळा, जाफर कुरेशी रा. वाजेगाव, अब्दुल कलाम पठाण रा. नुरी चौक, रशीद गणी कुरेशी, समीर पठाण रा. मदीनानगर, नांदेड व अन्य एकास अटक केली. त्यांच्याकडून पोलिसांनी ५ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अर्धापुरात विविध उपक्रमांद्वारे अभिवादन

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** माजी केंद्रीय गृहमंत्री स्व. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अर्धापूर येथे भाजपच्या वतीने विविध उपक्रम राबवून त्यांना अभिवादन करण्यात आले.

अर्धापूर येथील भाजप जनसंपर्क कार्यालयात आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या महाराष्ट्र व देशाच्या जडणघडणीतील ऐतिहासिक योगदानाचे आणि त्यांच्या कणखर नेतृत्वाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले.

यावेळी भाजप तालुकाध्यक्ष बालाजीराव पाटील गव्हाणे, नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, नगरसेवक सोनाजी सरोदे, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरुराज



रणखांब, ज्ञानेश्वर भरकड, बाबुराव जाधव, चंद्रमुनी लोणे, बालाजी कदम, माजी सरपंच शंकर ढगे यांसह शहर व ग्रामीण भागातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोन नवीन ट्रॅक्टर ट्रॉलींचे लोकार्पण आणि वृक्षारोपण शहरातील स्वच्छता यंत्रणा अधिक सक्षम व गतिमान करण्यासाठी नगरपंचायतीच्या वतीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. जयंतीचे औचित्य साधून शहराची स्वच्छता करण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या दोन नवीन ट्रॅक्टर ट्रॉलींचे पूजन करून त्या जनतेच्या सेवेसाठी समर्पित करण्यात आल्या.

तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शहरातील पुंडलिक नगर भागात मान्यवरांच्या हस्ते उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी उपनगराध्यक्ष मुस्वीर खतीब, मुख्याधिकारी जगदीश दळवी, नगरसेवक बाबुराव लंगडे, नगरसेवक राजेश्वर देशमुख, भाजयुमोचे शहराध्यक्ष तुकाराम माटे, व्यकटी राऊत, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे, सलीम कुरेशी, नंदकिशोर कल्याणकर, डॉ. युवराज डहाळे, डॉ. मस्के, डॉ. देशमुख, नितीन डहाळे, वृक्षलागवड विभाग प्रमुख कल्याण पाठक, शहर समन्वयक विशाल वाघमारे, राजकिरण साखरे, गणेश क्षीरसागर आदी उपस्थित होते.

## महापालिकेच्या प्रभाग क्र. २ मध्ये विशेष एसआयआर कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद; महापौरांच्या पुढाकाराने नागरिकांना दिलासा

### एसआयआर अभियानासाठी चैतन्य नगरमध्ये विशेष कॅम्प; आयुक्तांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या प्रभाग क्र. २, तरोडा बु. अंतर्गत येणाऱ्या चैतन्य नगर परिसरातील साईबाबा मंदिर प्रांगणात नुकताच विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला होता. महापौर कविता मुळे यांच्या पुढाकाराने राबवण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

मतदार यादी पुनरीक्षण अभियानाअंतर्गत आयोजित या शिबिरामुळे





परिसरातील नागरिकांना मतदानासंबंधीची कामे एकाच ठिकाणी सुलभपणे करता आली.

या शिबिराला नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला व शिबिराचे कौतुक केले. यावेळी उपजिल्हाधिकारी कोळीकर, मनपा उपायुक्त अजितपालसिंग संधू, मनपा उपायुक्त अभिजीत वायकोस आणि क्षेत्रीय अधिकारी नागनाथ पतंगे उपस्थित होते.

याप्रसंगी नगरसेवक सतीश देशमुख तरोडेकर, नगरसेवक आशुतोष जोशी, तरोडा मंडळ अध्यक्ष निलेश कुंटूरकर, तसेच वसंत जाधव, कैलास सावते, सखाराम तुपेकर, शुभम देशमुख, राहुल देशमुख आदी मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौरांच्या या लोक-हिताच्या उपक्रमाचे स्थानिक नागरिकांकडून विशेष कौतुक करण्यात येत आहे. एसआयआर काम अधिक सोपे आणि जलद झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती भोकरमध्ये विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी

**भोकर (प्रतिनिधी)–** माजी केंद्रीय गृहमंत्री तथा जलसंस्कृतीचे जनक डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती भोकर शहरात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

१४ जुलै रोजी डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वर्धापन दिनाचे औचित्य साधून बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर शहरातील मूकबधिर व अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

तसेच डॉ. शंकरराव चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समिती व नगरपरिषद कार्यालयात स्व. चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार



अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शहरात विविध ठिकाणी सामाजिक संस्था व राजकीय पक्षांच्या वतीने जयंती साजरी झाली.

याप्रसंगी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, सभापती जगदीश पाटील भोसीकर, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवडे, उपसभापती बालाजी शानमवाड, उज्ज्वल केसराळे, विशाल माने, कृष्णा वागतकर, डॉ. फिरोज इनामदार, शेख युसूफ, डॉ. मनोज गिमेकर, गणेश यशवंतकर, दिनेश लक्षटवार, गणेश बोलेवार, साईनाथ जटलावार, संजय घंटलवार, शेख नाजीम, गौतम कसबे, विकास क्षीरसागर, सुहास पवार, सिद्धेश्वर पिटलेवाड, श्रीकांत दरबस्तवार, अमोल शहांगटवार, प्रताप पाटील बोरगावकर, आगारप्रमुख संजयकुमार पुंडगे, अभिजीत गिरी, श्रीरंग पाटील, श्रीदत्त चटलावार, शेख मोहसीन, विजय चावरे, प्रकाश गंगासागरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com